रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर


◆ वर्ष १८ ◆ अंक ६२
www.ramprahar.com

शुक्रवार, १९ सप्टेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

'केटीएसपी'तील गैरकारभाराच्या चौकशीची साबळेंची मागणी/२
नेरळमध्ये आग, सुदैवाने मोठा अनर्थ टळला/५
आशिया चषकात आज भारत वि. ओमान लढत/८

## पुण्यात जोरदार पाऊस! रस्ते जलमय, वाहनांच्या रांगा



**पुणे :** मुसळधार पावसाने गुरुवारी (दि.१८) पुणे जिल्ह्याला झोडपून काढले. पुणे शहरात तर विविध भागातील रस्त्यांवर पाणीच पाणी पहायला मिळाले. पुण्यात दुपारपासून परतीच्या जोरदार पावसाने बाणेरकडून औंध, विद्यापीठ चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर गुडघाभर पाणी साचले. त्यामुळे रस्त्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. अचानक रस्त्यावर साचलेल्या पाण्यामुळे वाहनचालकांचे अतोनात हाल झाले. आंबेगाव कात्रज परिसरातही जोरदार पाऊस झाला. याशिवाय अहिल्यानगर महामार्गावरील रांजणगाव गणपती क्षेत्राजवळ पाणी आल्याने वाहतूक विस्कळीत झाली. अचानक झालेल्या पावसामुळे पादचारी आणि दुचाकीस्वारांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. दरम्यान, सध्या राज्यात पावसाचा जोर ओसरला असला तरी परतीचा पाऊस धुमाकूळ घालत असून जनजीवनावर परिणाम करीत आहे.

# धोरणांच्या निर्मितीतून समाजहित जोपासा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सरकारी यंत्रणांना निर्देश

### ■ सूक्ष्म, लघु उद्योगांसाठी एनए परवाना अट काढण्याचा निर्णय



**मुंबई : प्रतिनिधी**

सूक्ष्म आणि लघु उद्योग, अन्नप्रक्रिया उद्योग यासाठी जमिनीच्या काही मर्यादेत अकृषक परवान्याची अट काढण्याचा निर्णय सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी (दि.१८) आयोजित धोरणात्मक सुधारणा बैठकीत घेण्यात आला.

या शासन निर्णयामुळे सूक्ष्म आणि लघु उद्योगांना अकृषक परवाना मिळण्यासाठी लागणाऱ्या वेळेची बचत होऊन त्यांना वेळेत उद्योग सुरू करणे सोयीचे होणार आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

बैठकीस मुख्य सचिव राजेश कुमार, अपर मुख्य सचिव (वने) मिलिंद म्हैसकर, अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी. गुप्ता, अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे, अपर मुख्य सचिव (नगरविकास) के. गोविंदराज, प्रधान सचिव (नियोजन) सौरभ विजय, मित्रा संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी आदी उपस्थित होते.

राज्याची सर्वच क्षेत्रात प्रगती करण्यासाठी शासन विविध धोरणांची अंमलबजावणी करीत असते. या धोरणांमध्ये भविष्यातील आव्हानांचा वेध घेत व्यापक समाजहित असणे गरजेचे आहे. सामान्य नागरिकाचे जीवन अधिकाधिक सुसह्य करण्यासाठी या धोरणांचा उपयोग व्हावा, अशी अपेक्षा मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केली.

## हैदराबाद गॅझेट 'जीआर' विरोधातील याचिका हायकोर्टाने फेटाळली

**मुंबई : प्रतिनिधी**

हैदराबाद गॅझेटियरच्या अंमलबजावणीला मान्यता देणाऱ्या राज्य सरकारच्या अधिसूचनेला (जीआर) आव्हान देणारी याचिका गुरुवारी (दि.१८) मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळली. शासन निर्णयाने याचिकाकर्ते बाधित कसे? असा सवाल करत अशा स्वरूपाची जनहित याचिका कशी असू शकते, असा सवालही न्यायालयाने केला.

मराठा समाज नेते मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनानंतर सरकारने राज्यात हैदराबाद गॅझेट लागू करण्यासंदर्भात जीआर काढला होता. या आदेशाविरोधात वकील असलेले विनीत धोत्रे यांच्या वतीने जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. सुनावणीवेळी या जनहित याचिकेच्या ग्राह्यतेवरच मुंबई उच्च न्यायालयाने प्रश्नचिन्ह उपस्थित केले, मात्र याचिकाकर्त्याला रीट याचिका म्हणून सक्षम कोर्टासमोर दाद मागण्याची कोर्टाने मुभा दिली आहे.

## पनवेलमध्ये आज युवा संवाद मेळावा

### मंत्री आशिष शेलार यांचे लाभणार मार्गदर्शन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सेवाव्रती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त उत्तर रायगड जिल्हा भारतीय जनता पक्षाच्या वतीने शुक्रवारी (दि. १९) सायंकाळी ५ वाजता पनवेलमध्ये युवा संवाद मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्याला राज्याचे माहिती व तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्यमंत्री अ‍ॅड.आशिष शेलार यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

देशाचे कणखर नेतृत्व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरपर्यंत सेवा पंधरवडा आयोजित करण्यात आला असून या माध्यमातून विविध समाजोपयोगी उपक्रमांचे मोठ्या प्रमाणात राबविण्यात येत आहेत. या अंतर्गत युवकांच्या पुढील वाटचालकिरता 'विकसित भारत विकसित महाराष्ट्र' या शिर्षकाखाली युवा संवाद मेळावा पनवेल शहरातील विरूपाक्ष मंगल कार्यालयात होणार आहे.

या मेळाव्यावेळी पनवेल मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर, उरण मतदारसंघाचे आमदार महेश बालदी, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# भाजप पनवेल दक्षिण मंडळ पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान

## ▶ संधीचे सोने करा –आमदार प्रशांत ठाकूर ▶ समाजाच्या अपेक्षा पूर्ण करा –आमदार महेश बालदी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवनियुक्त पदाधिकाऱ्यांवर सोपवण्यात आलेल्या जबाबदारीचे त्यांनी सोने करावे, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी नियुक्तीपत्र प्रदान सोहळ्यावेळी केले तसेच पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना मिळेलेली प्रत्येक जबाबदारी योग्यरित्या बजावल्यास येणाऱ्या निवडणुकांमध्ये आपल्याला नक्कीच यश मिळेल असा विश्वास व्यक्त केला; तर आमदार महेश बालदी यांनी समाजाच्या ज्या अपेक्षा आहे त्या पूर्ण करण्याची जबाबदारी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांवर आहे, असे प्रतिपादन केले.

भाजप पनवेल दक्षिण मंडळातील सर्व पदाधिकाऱ्यांचा नियुक्तीपत्र प्रदान सोहळा बुधवारी (दि. १७) कर्नाळाजवळील हद्दीतील विसावा रिसॉर्टमध्ये झाला. आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्यासह उपस्थित अन्य मान्यवरांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. त्या वेळी ते बोलत होते.

भाजपच्या पनवेल दक्षिण मंडळाची नवीन कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली आहे.



(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

यामध्ये अध्यक्ष मंगेश वाकडीकर, सरचिटणीस सुनील गवंडी, प्रफुल पाटील, उपाध्यक्ष सुनील माळी, संजय टेंबे, शेखर पाटील, प्रवीण खंडागळे, रोहन म्हात्रे, शेखर कानडे, चिटणीस विजय मुरकुटे, मनोज पवार, महिला चिटणीस सुनिता चितळे, सपना वारके, शर्मिला माळी आणि संगीता टाकळे यांचा समावेश आहे.

याचबरोबर मंडळ मोर्चा, सेल आणि प्रकोष्ठ आघाडीच्या अध्यक्षपदीही अनेक पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. यामध्ये महिला मोर्चा अध्यक्ष रेखा माळी, युवा मोर्चा अध्यक्ष मयूर शेलार, अनुसूचित जाती मोर्चा अध्यक्ष महादेव कांबळे, ओबीसी मोर्चा अध्यक्ष दिनेश पाटील, अल्पसंख्याक मोर्चा अध्यक्ष अकलाक बडे, आदिवासी मोर्चा अध्यक्ष भरत वाघे, किसान मोर्चा अध्यक्ष आत्माराम हातमोडे, दक्षिण भारतीय सेल अध्यक्ष मुथुरम मोटियापोईलन, कामगार आघाडी अध्यक्ष लक्ष्मण म्हात्रे, जैन प्रकोष्ठ अध्यक्ष धीरज जैन, आध्यात्मिक आघाडी अध्यक्ष दिनेशमहाराज मते, सहकार सेल अध्यक्ष रमेश मोरे, सोशल मीडिया सेल अध्यक्ष सुबोध ठाकूर, आयटी सेल अध्यक्ष भरत जुमलेदार, भटके विमुक्त आघाडी अध्यक्ष लक्ष्मण बावधने, सांस्कृतिक सेल अध्यक्ष कांता गावंड, वाहतूक सेल अध्यक्ष प्रितेश मुकादम, आयुष्यमान भारत सेल अध्यक्ष तानाजी पाटील, बेटी बचाव बेटी पढाव सेल अध्यक्ष निशा घरत, व्यापार आघाडी अध्यक्ष दीपक म्हात्रे, मच्छीमार सेल अध्यक्ष ज्ञानेश्वर भोईर, वैद्यकीय सेल अध्यक्ष अनिकेत इनामदार, शिक्षण सेल अध्यक्ष अनिल पाटील, **(पान २ वर..)**

## निवडक

### अभिनेता श्रेयस तळपदेवर उत्तराखंडमध्ये गुन्हा दाखल

**डेहराडून :** लोणी अर्बन मल्टी-स्टेट अँड थ्रिफ्ट कोऑपरेटिव्ह सोसायटी घोटाळाप्रकरणी रायपूर पोलीस ठाण्यात आणखी एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चित्रपट अभिनेते आलोक नाथ आणि श्रेयस तळपदे यांच्यासह इतर १३ जणांना या प्रकरणात आरोपी करण्यात आले आहे. हे दोन्ही अभिनेते फर्मचे ब्रँड ॲम्बेसिडर होते, असे यात म्हटले आहे.

### ईपीएफओकडून नवीन पासबुक लाईट फिचर लाँच

**नवी दिल्ली :** कामगार भविष्य निर्वाह निधी संघटनेने (ईपीएफओ) आपल्या सात कोटींहून अधिक सदस्यांसाठी पासबुक लाईट हे नवीन फीचर सुरू केले आहे, ज्यामुळे पीएफ खातेदारांना त्यांच्या खात्यातील शिल्लक एकाच क्लिकवर पाहता येईल.

## 'राहुल गांधी फक्त आरोप करतात, पण सिद्ध करण्याची वेळ येताच पळून जातात'

### भाजपचा हल्लाबोल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी गुरुवारी (दि.१८) पुन्हा एकदा पत्रकार परिषद घेऊन विविध मतदारांमध्ये मतचोरी झाल्याचा आरोप केला. त्यानंतर भाजप नेते खासदार अनुराग ठाकूर यांनी जोरदार पलटवार केला. 'राहुल गांधी वारंवार होणाऱ्या पराभवामुळे आणि जनतेच्या नाकारण्यामुळे निराश झाले आहेत. त्यामुळेच ते फक्त आरोप करतात, पण सिद्ध करण्याची वेळ येते, तेव्हा पळून जातात,' असा हल्लाबोल ठाकूर यांनी केला.

अनुराग ठाकूर पुढे म्हणाले की, राहुल गांधींना खोटे आणि निराधार आरोप करण्याची सवय लागली आहे.



निवडणूक आयोग त्यांच्या आरोपांची पडताळणी करण्यास सांगते आणि प्रतिज्ञापत्र देण्यास सांगते, तेव्हा ते मागे हटतात. आरोप करून नंतर माफी मागणे आणि न्यायालयाकडून फटकारे खाणे हे त्यांचे नेहमीचे काम झाले आहे.

राहुल गांधी पत्रकार परिषदेत हायड्रोजन बॉम्ब फोडणार होते, परंतु त्यांना फुलबाजीवर काम भागवावे लागले. त्यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने जवळपास ९० निवडणुका हरल्या आहेत. त्यामुळेच त्यांची निराशा वाढत आहे. त्यांना भारतात बांगलादेश आणि नेपाळसारखी परिस्थिती आणायची आहे. राहुल गांधींनी स्वतः पत्रकार परिषदेत कबूल केले की, ते लोकशाही वाचवण्यासाठी येथे नाहीत. जर लोकशाही वाचवायची नसेल, तर ती नष्ट करण्याचे त्यांचे ध्येय आहे का? टूलकिटची मदत घेऊन ते सतत आपल्या संवैधानिक संस्थांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करतात आणि त्यांना कमकुवत करण्याचा प्रयत्न करतात, असेही अनुराग ठाकूर यांनी म्हटले.

### निवडणूक आयोगानेही फेटाळले आरोप

**नवी दिल्ली :** काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केलेले आरोप निवडणूक आयोगाने फेटाळून लावले आहेत. हे आरोप चुकीचे आणि निराधार असल्याचे आयोगाने म्हटले आहे.

राहुल गांधी यांनी सांगितल्याप्रमाणे कोणतेही मत ऑनलाइन डिलीट केले जाऊ शकत नाही. व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची तसेच संधी दिल्याशिवाय कोणतेही मत हटवले जाऊ शकत नाही. २०२३मध्ये आलंद विधानसभा मतदारसंघात मतदारांची नावे हटवण्याचे काही प्रयत्न झाले होते. या प्रकरणी आम्ही स्वतः तक्रार दिली होती, अशी माहितीही आयोगाने दिली.

## आरएसएसचे ज्येष्ठ प्रचारक मधुभाई कुलकर्णी यांचे निधन

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**



राष्ट्रीय स्वयंसेवक संघांचे ज्येष्ठ प्रचारक मधुभाई कुलकर्णी (वय ८८) यांचे वार्धक्यामुळे गुरुवारी (दि. १८) दुपारी १२.३० वाजता निधन झाले. त्यांनी देहदान केले आहे.

बेळगाव जिल्ह्यातील चिकोडी येथे १७ मे १९३८ रोजी जन्मलेले मधुभाई साठच्या दशकात छत्रपती संभाजीनगर येथे संघाचे प्रचारक म्हणून आले. त्यानंतर त्यांना १९८५मध्ये गुजरातमध्ये प्रांतप्रचारक म्हणून पाठवण्यात आले. तिथे त्यांनी तत्कालीन संघ प्रचारक व आताचे पंतप्रधान नरेंद्र मोदींना भाजपमध्ये पाठवले होते. पुढे मोदी गुजरातचे मुख्यमंत्री व नंतर पंतप्रधान झाले.

मधुभाई यांनी विभाग, प्रांत, क्षेत्रीय प्रचारक अशा जबाबदाऱ्या संघात सांभाळल्या. गेल्या काही वर्षांपासून वृद्धापकाळाने त्यांचे वास्तव्य छत्रपती संभाजीनगरात होते. मधुभाईंचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी संघाच्या 'समर्पण' या कार्यालयात ठेवण्यात आले होते. या वेळी अनेकांनी अंत्यदर्शन घेतले.

## नवरात्रोत्सवाची जोरदार तयारी

### देवींच्या मूर्तींवर फिरवला जातोय अखेरचा हात



**तळा : प्रतिनिधी**

गणेशोत्सव साजरा झाल्यानंतर नवरात्रोत्सवाची जोरदार तयारी सुरू झाली आहे. मूर्तीकारांनी देवीच्या मूर्तीची रंगरंगोटी पूर्ण करून अखेरचा हात फिरवण्यास सुरुवात केली आहे. अनेक मंडळांनी मूर्तीकारांकडे दरवर्षीप्रमाणे मूर्तींची मागणी करून त्या मूर्तीकारांकडून नेण्यास आता मंडळे सज्ज झाली आहेत.

नवरात्रोत्सवाचे वेध सर्वांना लागले आहेत. यंदा २२ सप्टेंबर रोजी घटस्थापना आहे. त्या दिवशी देवीची घरगुती तसेच सार्वजनिक स्वरूपात पहिली पूजा केली जाईल. या उत्सवाच्या तयारीची सर्वत्र लगबग दिसत आहे. एकीकडे तरुण वर्ग तर दांडिया खेळण्यासाठी लागणाऱ्या वेगवेगळ्या प्रकारच्या टिपऱ्या तसेच आकर्षक ड्रेस खरेदीसाठी सरसावताना पहावयास मिळत आहेत. त्याचबरोबर नवरात्र उत्सव मंडळे सुशोभीकरणाची तयारी करत आहेत. मंडपांची बांधाबांध सुरू आहे. त्याचबरोबर रंगीत व नयनरम्य विद्युत माळा, डीजे यांची तजवीज केली जात आहे.

गावागावामध्ये ग्रामदैवताचे व देवींच्या मंदिरात नवरात्रोत्सव पारंपारिक पद्धतीने साजरा होणार आहे. त्याचबरोबर कुलदैवतांचेही घट मांडले जाणार आहेत. ठिकठिकाणी नवरात्रीचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत असतो. या काळात भक्तगण प्रसिद्ध देवी मंदिरांमध्ये दर्शनास आवर्जून येतात.

एकंदर सगळीकडे देवीच्या आगमनाचे वेध भाविकांना लागले आहेत. त्यामुळे मूर्तीकार व्यस्त दिसून येत आहेत. या संदर्भात मूर्तीकार सतिश शिंदे यांच्याशी संवाद साधला असता ते म्हणाले की, नवरात्रोत्सव जवळ आला असून रंगकामाचा अंतिम हात मारण्याचे काम सुरू आहे.

## महाड शहरात चिकनगुनियाची साथ



**महाड : प्रतिनिधी**

महाड शहराच्या चवदार तळे व परिसरात मागील काही दिवसांपासून चिकनगुनिया आजाराचे रुग्ण आढळून आले आहेत. यानंतर नगर परिषदेच्या आरोग्य विभागाकडून परिसरात स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली आहे, मात्र ही साथ संपूर्ण शहरभर पसरण्याची भिती नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

चवदार तळे परिसरातील अनेक इमारतींमध्ये प्रत्येक घरात दोन ते तीन नागरिक चिकनगुनियाच्या आजाराने त्रस्त आहेत. या साथीसंदर्भात नगर परिषदेला अशा पद्धतीची माहिती प्राप्त झाली नसल्याचे सांगण्यात आले, मात्र अत्यावश्यक असणारी उपाययोजना बुधवार सकाळपासूनच अमलात आणण्यात आली. चवदार तळे व डोंगरीपूल परिसरात स्वच्छता मोहीम आणि धुराच्या यंत्राने सर्व इमारती तसेच घरांच्या परिसरामध्ये आवश्यक असलेली फवारणी केल्याची माहिती नगर परिषदेकडून देण्यात आली.

दरम्यान, खासगी वैद्यकीय तपासणी लॅबमध्ये चिकनगुनियाचे रुग्ण आढळले असून नागरिक खासगी डॉक्टरांकडे उपचारासाठी जात आहेत, मात्र याबाबतची नेमकी वस्तुस्थिती व रुग्णांची आकडेवारी नगरपालिकेला उपलब्ध होत नाही. त्यामुळे साथीचा आवाका कळत नाहीये.

## पनवेलमध्ये ४३.९८ टन निर्माल्यातून खत प्रक्रिया

### पर्यावरणभिमुख गणेशोत्सवाची मनपाकडून अंमलबजावणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या उत्सव गणरायाचा, जागर पर्यावरणाचा या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. गणेशोत्सवात तब्बल ४३.९८ टन निर्माल्याचे संकलन झाले असून त्यातून आता खत निर्मिती केली जाणार आहे.

यंदा गणेशोत्सव काळात पनवेल महापालिकेने पर्यावरणाभिमुख गणेशोत्सवाची संकल्पना राबवली. घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या सूचनेनूसार विसर्जनस्थळी आणल्या जाणाऱ्या गणेशमूर्तींच्या गळ्यातील फुलांचे हार, सजावटीचे सामान, पुष्पमाला, फुले, दुर्वा, शमी यासारखे पुनर्प्रक्रिया करण्यायोग्य निर्माल्य टाकण्यासाठी कलशांची व्यवस्था करण्यात आली होती.



याशिवाय घरगुती उत्सव तसेच सार्वजनिक मंडळांमध्ये दररोजच्या निर्माल्याचे संकलन चार विशेष निर्माल्य रथांद्वारे करण्यात आले. या माध्यमातून ४३ टन ९८० किलो निर्माल्य जमा झाले. ते प्रक्रिया केंद्रांच्या ठिकाणी पोहचवून त्याचे खतामध्ये रूपांतर करून महापालिकेच्या बगीचे व पार्कमधील झाडांसाठी वापरण्यात येईल. दरम्यान, ७८६५ किलो निर्माल्य डॉ.श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानने संकलित केले असून त्यावर त्यांच्याचमार्फत पर्यावरणपूरक प्रक्रिया करण्यात येणार आहे.

# सेवा हमी कायद्यांतर्गत अकराशे सेवा १ मेपर्यंत डिजिटल करणार -मुख्यमंत्री

**पुणे : प्रतिनिधी**

महसूल विभागाच्या विविध सेवा देताना आधुनिक तंत्रज्ञानाच्या उपयोगाद्वारे सामान्य माणसाच्या जीवनात परिवर्तन आणले जाईल. त्याची सुरूवात सेवा पंधरवड्याच्या निमित्ताने करण्यात येत आहे. सामान्य माणसाचे जीवन अधिक सुलभ करताना त्याच्या समस्या वेगाने दूर करण्यासाठी सेवा हमी कायद्यांतर्गत अकराशे सेवा येत्या १ मेपर्यंत डिजिटल पद्धतीने उपलब्ध करून देण्यात येतील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

श्री गणेश कला क्रीडा रंगमंच येथे आयोजित 'सेवा पंधरवड्या'च्या राज्यस्तरीय शुभारंभ कार्यक्रमात ते बोलत होते. छत्रपती शिवाजी महाराजस्व अभियानांतर्गत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती दरम्यान राज्यभरात 'सेवा पंधरवड्या'चे आयोजन करण्यात आले आहे.

याप्रसंगी उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, महसूल राज्यमंत्री योगेश कदम, खासदार मेधा कुलकर्णी, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, विभागीय



आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार, जमाबंदी आयुक्त डॉ. सुहास दिवसे, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक रवींद्र बिनवडे, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सामान्य माणसाचे जीवन सुखी आणि समृद्ध करण्यासाठी शासनाच्या सेवा सुलभ असणे गरजेचे आहे. सेवा पंधरवडा आणि छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान हा त्याचाच भाग असून त्यामुळे अनेकांच्या जीवनात परिवर्तन आणण्याचे कार्य होणार आहे. शेतकऱ्यांसाठी पाणंद रस्त्यांचे महत्त्व ओळखून आणि त्यासंदर्भातील वाद टाळण्यासाठी या रस्त्यांचे जीआयएस मॅपींग करण्यात येणार आहे आणि येत्या काळात हे रस्ते तयार करण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे आपसातील वाद संपुष्टात येतील. या पाणंद रस्त्यांमुळे या गावांचे अर्थकारण बदलेल, नाम फाऊंडेशनच्या सहकार्याने हा उपक्रम एक लोकचळवळ होईल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

ई-नोंदणीच्या माध्यमातून सामान्य

### डिजिटल सेवेद्वारे नागरिकांचे जीवन सुसह्य करण्याचा प्रयत्न

***सेवा हमी कायद्यांतर्गत अकराशे सेवा डिजीटली देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. या सेवांसाठी नागरिकांना शासकीय कार्यालयात जाण्याची आवश्यकता नाही. यातील ४४ सेवांसाठी ९० टक्के नागरिक अर्ज करतात. म्हणून पुढील तीन महिन्यात या ४४ सेवा डिजीटल असतील, तर २६ जानेवारीपर्यंत २०० सेवा आणि १ मे २०२६ पर्यंत सर्व १ हजार १०० सेवा डिजीटल पद्धतीने, व्हॉट्सपवर उपलब्ध करून देण्यात येतील.***

माणसाला होणारा त्रास कमी होणार आहे, ही अतिशय चांगली व्यवस्था आहे. कार्यालयात नोंदणी करण्यासाठीही चांगल्या सुविधा देण्यात येणार आहे. लोकअदालतीच्या उपक्रमाद्वारे अनेक वर्ष प्रलंबित असलेली प्रकरणे निकालात काढण्यास मदत होणार आहे. महसूल विभागात डिजीटायझेशन होत आहे, ब्लॉक चेन तंत्रज्ञान येत आहे. मात्र, नवे तंत्रज्ञान उपयोगात आणताना मानवी चुकांमुळे नवीन प्रकरणे तयार होणार नाहीत, याची दक्षता सर्वांनी घ्यावी आणि जुनी प्रकरणे लोकअदालतीच्या माध्यमातून निकाली काढावीत, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.

जमहसूल विभागाच्या विविध उपक्रमांचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते विविध योजनांचे लाभ वितरण करण्यात आले. पुणे जिल्ह्यातील दहा नाविन्यपूर्ण प्रकल्प, पाणंद रस्त्यासाठी 'ई-ग्राम' जीआयएस प्रणाली, जमाबंदी आयुक्त यांचेकडील 'जमीन माहितीपीठ' डॅशबोर्ड आणि नोंदणी मुद्रांक विभागाच्या 'ई-प्रमाण' प्रणालीचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी नाम फाऊंडेशन आणि जिल्हाधिकारी कार्यालयात सामंजस्य करार करण्यात आला. या करारांतर्गत ई-ग्राम प्रणाली अंतर्गत सीमांकन करण्यात येणारे रस्ते तयार करण्यासाठी नाम फाऊंडेशनचे सहकार्य होणर आहे. महाविद्यालये व ग्रामपंचायतींना द्यावयाच्या प्रमाणपत्रांचे आणि घरकूल लाभार्थ्यांना दिलेल्या जमीनपट्ट्यांचे वितरणही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमापूर्वी मुख्यमंत्री श्री.फडणवीस आणि उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी अन्य मान्यवरांसह 'एम -सँड' एक्स्पो सह इतर जिल्हा प्रशासनाच्या सेवा कक्षाला भेट देऊन माहिती घेतली.

## 'केटीएसपी' गैरकारभाराच्या चौकशीची साबळेंची मागणी

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळात मोठ्या प्रमाणात सुरू असलेल्या गैर कारभाराविरोधात संस्थेचे संचालक यशवंत साबळे गेली काही दिवस आक्रमकपणे आवाज उठवत आहेत. संस्थेच्या अध्यक्षांनी अनेक लोकांच्या नावावर खोटी बिलं दाखवून लाखो रुपयांचा घोटाळा केल्याचा आरोप यशवंत साबळे यांनी केलाय. जिल्हा शिक्षण अधिकारी आणि अर्थिक गुन्हे शाखेने यांची चौकशी करावी अशी मागणीही यशवंत साबळे यांनी केली आहे.

खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळावर गंभीर आरोप करत संस्थेचे संचालक यशवंत साबळे यांच्याकडून संस्थेची लक्तरं वेशीवर टांगली जात असताना, माजी अध्यक्ष आणि जेष्ठ संचालक दत्तात्रेय मसुरकर यांनीही संस्थेच्या कारभाराबाबत संशय व्यक्त केलाय. मसुरकर यांनी अनेक मुद्दे उपस्थित केलेत. सामान्य सभासद, पेंट्स, फेलोज ही यादी, फायनान्स आणि जिल्हा बँकेकडून घेतलेल्या कर्जाची माहिती पुर्णपणे दिशाभूल करणारी आणि चुकीची असून वेळोवेळी खुलासे मागितले असता अध्यक्षांनी चालढकल केल्याचा आरोप मसुरकरांनी केला आहे.

लेखी पत्र देवून माजी अध्यक्ष आणि जेष्ठ संचालक दत्तात्रेय मसुरकर यांनी संस्थेच्या कारभाराबाबत संशय व्यक्त केल्याने खळबळ उडाली असतानाच, संस्थेच्या अध्यक्षांनी अनेक लोकांच्या नावावर खोटी बिलं दाखवून लाखो रुपयांचा घोटाळा केल्याचा आरोप साबळे यांनी केलाय. अध्यक्षांनी संस्थेच्या खात्यातून एक लाख रुपये काढले आहेत. स्वतःच्या चालकाच्या नावावर १३ लाख रुपये उचलण्यात आले आहेत. विक्रम शेठ ६ लाख रुपये, वैभव गुडे यांच्या नावावर ५ लाख रुपये उचलण्यात आले असून ही दोन लोकं कोण आहेत? प्रशांत न्यु डिजिटल या नावाने २३ लाख रुपयांची बिलं अदा करण्यात आली आहेत. प्रशांत न्यु डिजिटलचे मालक खालापूर नगरपंचायतीमध्ये शेकापक्षाचे विद्यमान नगरसेवक असून संस्थेच्या अध्यक्षांच्या अत्यंत जवळच मानले जातात. त्यांच्या नावावर खोटी बिलं काढून अध्यक्षांनी ही रक्कम स्वतःच्या फायद्यासाठी वापरल्याचा आरोप यशवंत साबळे यांनी केला आहे. जिल्हा शिक्षण अधिकारी आणि अर्थिक गुन्हे शाखेने यांची चौकशी करावी अशी मागणीही केली आहे.

## संयम आणि संतुलन हेच खरे प्रगतीचे सूत्र -युवाचार्य महेंद्र ऋषिजी

**पनवेल,: रामप्रहर वृत्त**

जैन स्थानक येथे बुधवारी पूंछिस्सूण संपूट साधनेच्या अंतर्गत १७व्या श्लोकाचे विश्लेषण करताना श्रमणसंघीय युवाचार्य महेंद्र ऋषिजी म्हणाले, जसे जंगलातील नंदनवन सर्वोत्तम असते, तसेच महावीर प्रभूंचे व्यक्तिमत्त्व जगात अद्वितीय आहे. त्यांचे वचन थकलेल्या प्रवाशाला सावली देणाऱ्या झाडासारखे आहे, जे निराश आत्म्याला आधार व नवीन दिशा प्रदान करते.

युवाचार्य प्रवरांनी सांगितले की, झाड कोणाचे अपमान करत नाही, ते कापले गेले तरी फळ व सावली देते. हा वृक्षाचा स्वभाव आत्मसात करणे हेच जीवनातील खरी साधना आहे. त्यांनी अधोरेखित केले की, अंधाधुंध विकास म्हणजे निसर्गासोबत खेळ, आणि याचे स्पष्ट उदाहरण पंजाब व जम्मू-काश्मीरमधील अलीकडील नैसर्गिक आपत्ती आहेत पूर्वी सामाजिक समारंभ साधेपणा व संतोषावर आधारित असायचे, परंतु आज विवाहासारख्या कार्यक्रमांमध्ये दृष्य व जेवणांची संख्या ही प्रगतीचे मोजमाप बनली आहे. खरी प्रगती संयम आणि संतुलनात आहे, भोगविलास व आडंबरात नाही.

यावेळी युवाचार्यश्रींनी आचार्य सम्राट डॉ. शिवमुनिजी महाराजांच्या जन्मदिवसाच्या निमित्ताने त्यांच्या जीवनाची आठवण करून दिली. त्यांनी पंजाबच्या संयुक्त कुटुंबातून साधनापथाची सुरुवात केली व परदेश प्रवासातही धर्म-संस्कार जिवंत ठेवले. त्यांचे जीवन झाडाच्या सावलीसारखे व नंदनवनासारखी शांतता देणारे आहे, ज्याने साधकांना ध्यान-साधनेचा अमृत दिले व जीवनाला नवीन दिशा दिली.

धर्मसभेत एस.एस. जैन महासंघ, मंगल देश (पंजाब) अध्यक्ष सुभाष जैन, सिरसा येथून संदीप जैन, श्रीगंगानगर येथून मोहनलाल जैन, गुरमेल सिंह जैन, अमरजीत सिंह जैन, तिंथ जैन, मुकेश जैन, रोशन जैन यांसह ३५ सदस्यांचे प्रतिनिधी मंडळ युवाचार्यश्रींकडे पंजाब येथे आमंत्रण देण्यासाठी आले. तसेच भारत जैन महामंडळाचे राष्ट्रीय युवक अध्यक्ष महेंद्र पंगारिया, लोनावला येथून अमोल नाहर आणि चेन्नई, खाचरौद, चालीसगाव इत्यादी श्रीसंघांचे श्रद्धाळू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

चातुर्मास समितीचे मंत्री रणजीतसिंह कांकरेजा यांनी माहिती दिली की, गुरुवारी युवाचार्यश्रींच्या सानिध्यात आचार्य सम्राट डॉ. शिवमुनिजी महाराजांच्या जन्मदिवसानिमित्त गुणगान व एकासनाचे विशेष आयोजन होणार आहे.

## पनवेल महापालिका निवडणूक प्रारूप रचनेवर सुनावणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या २०२५ च्या सार्वजनिक निवडणुकीसाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारूप प्रभाग रचनेस मा. राज्य निवडणूक आयोग यांनी मान्यता दिलेली आहे. मा. उपसचिव नगर विकास विभाग यांच्याकडील पत्रानूसार दिनांक ३ सप्टेंबर २०२५ ते १५ सप्टेंबर २०२५ या कालावधीत प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध करण्यात आली होती व यावरील हरकती व सूचना मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार आज दिनांक १८ सप्टेंबर रोजी , आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह पनवेल येथे मा. जिल्हाधिकारी रायगड यांच्या अध्यक्षतेखाली सुनावणी घेण्यात आली. प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारूप प्रभाग रचनेवरती एकुण २८२ हरकतीं आल्या होत्या. विहित वेळेत उपस्थित राहिलेल्या अर्जदारांच्या सर्व १०१ हरकतींवरती सुनावणी घेण्यात आली.

## स्वच्छता ही सेवा अभियानाचा वृक्षारोपणाव्दारे डॉ. एपीजे अब्दुल कलाम उद्यान वाशी येथे शुभारंभ

**नवी मुंबई : बातमीदार**

'स्वच्छता ही सेवा अभियान' अंतर्गत २ ऑक्टोबरपर्यंत स्वच्छता आणि पर्यावरण विषयक विविध कार्यक्रमांचे नियोजन महानगरपालिकेने केले असून त्यामध्ये लोकसहभागावर विशेष भर दिला जात असल्याचे सांगत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी स्वच्छता ही सेवा अभियानाच्या शुभारंभप्रसंगी वृक्षारोपण कार्यक्रमाला नागरिकांची मोठया प्रमाणावर उपस्थिती असल्याबद्दल आनंद व्यक्त केला. यामध्ये शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक यांच्यासमवेत तृतीयपंथी नागरिकांची लक्षणीय उपस्थिती होती.



'स्वच्छ भारत मिशन'च्या वतीने दि.१७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर २०२५ या पंधरवडा कालावधी 'स्वच्छता ही सेवा २०२५' हे अभियान राबविण्याचे जाहीर करण्यात आले असून नवी मुंबई महानगरपालिकेने महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली १५ दिवस दररोज स्वच्छता विषयक विविध उपक्रम राबविण्याचे नियोजन केले आहे. त्याचा शुभारंभ से.१० ए येथील मिनी सी शोअर वरील डॉ. एपीजे अब्दुल कलाम उद्यानामध्ये वृक्षारोपणाव्दारे झाला. याप्रसंगी आयुक्त डॉ. कैलास शिंदे,अधिकारी, कर्मचारी आणि विविध क्षेत्रातील नागरिक यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

'एक पेड माँ के नाम' या विशेष उपक्रमांतर्गत देशी वृक्षरोपांची डॉ. एपीजे अब्दुल कलाम उद्यानात लागवड करण्यात आली याप्रसंगी विविध स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी यांचा उत्साहवर्धक सहभाग होता. यामध्ये किन्नर माँ बचत गट संस्थेतील १२५ हून अधिक तृतीयपंथी नागरिक उत्साहाने सहभागी झाले होते.वाशी विभागातील शालेय,विद्यार्थ्यांसह महाविद्यालयातील विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

पान १ वरुन

## भाजप पनवेल दक्षिण मंडळ पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान

ज्येष्ठ कार्यकर्ता सेल अध्यक्ष शांताराम मालुसरे, दिव्यांग सेल अध्यक्ष सुजित पाटील, कायदा सेल अध्यक्ष जितेंद्र जाधव, क्रीडा प्रकोष्ठ अध्यक्ष अतुल माळी, उद्योग आघाडी अध्यक्ष राम गाताडे, पदवीधर प्रकोष्ठ अध्यक्ष संतोष माळी, पंचायतराज व ग्रामविकास अध्यक्ष गीतांजली गाताडे यांचा समावेश आहे. इतरही मान्यवरांची नियुक्ती झाली आहे. या सर्व पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

या सोहळ्याला भाजप नेते राजेंद्र पाटील, अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, किरण माळी, संतोष पाटील, बाळू पाटील, अविनाश गाताडे, विद्याधर जोशी, हभप अनंता पाटील, जगदीश पवार, जीवन म्हात्रे, रेश्मा माळी, कसळखंडचे सरपंच संजय घरत, दिघाटीच्या सरपंच रजनी ठाकूर, रंजना गायकवाड, सुशील ठाकूर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नवरात्रोत्सवाचे वेध; मुरूडमध्ये ७६ देवी मूर्तींची होणार स्थापना


**मुरुड : प्रतिनिधी**

गणेशोत्सवानंतर भाविकांना आता नवरात्रौत्सवाचे वैध लागले असून येत्या २२ सष्टेबर रोजी देवीची घटस्थापना करण्यात येणार आहे.

तालुक्यातील सर्वच ठिकाणी गणेश कला मंदिरात ही देवी बनवण्याचं काम जोरदार सुरू आहे.हुबेहूब देवी बनवण्याचं काम म्हटलं की डोळ्यासमोर येतात त्या आशिष खोत च्या सुबक आणि सुप्रसिद्ध देवीची मूर्ती सुंदर अशी नयनांची युग्मता ,पाणीदार आणि जिवंत डोळे तसेच विविध प्रकारच्या रंगसंगतीने या मूर्तीकडे भक्त आपोआपच आकर्षिले जातात.

मुरूड बाजारपेठेतील चंद्रकांत गणपत खोत यांनी ७० वर्षांपुर्वी गणेश कला मंदिराची स्थापना केली होती यामध्ये शाडुच्या मातीच्या आकर्षक गणेशमूर्ती व देवीच्या मूर्ती घडविण्याचं काम करित तिच परंपरा त्याचा मुलगा आशिष चंद्रकांत खोत यांनी सुरू ठेवली आहे.त्याच्या बरोबर अथर्व आशिष खोत काम उत्तम पणे मुर्ती घडविण्याचं काम करित आहेत.खोत गणेश कला मंदिराला साथ देण्यासाठी बाळकृष्ण पाटील, अजय जंजिरकर, सनी पुलेकर, अनूज मसाला, बाळकृष्ण मसाल करित असतात.यांच्या देवीच्या मूर्तीना शहरांसह पंचक्रोशी भागात मागणी जास्त असते.

मूरूड पोलीस ठाणे हद्दीत सार्वजनिक ६३ व खाजगी १३अशा देवीची मूर्तीची स्थापना होणार असून घट १५ तर ८फोटोची घरगुती प्रमाणे स्थापना करून पारंपरिक पद्धतीने पूजा केली जाते.अशि माहिती पोलीस मकरंद पाटील यांनी दिली .



## रसायनीत बनावट पोलीस बनून कार लंपास करणारा पोलिसांच्या जाळ्यात

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

बनावट पोलीस असल्याची बतावणी करून नागरिकांची फसवणूक करणाऱ्या टोळीवर रसायनी पोलिसांनी कारवाई केली आहे. १० सप्टेंबर रोजी चांभार्ली येथे दोन अनोळखी इसमांनी साहेब आम्ही पोलीस आहोत असे सांगून तक्रारदाराची टाटा टियागो कार लंपास केली होती. यानंतर कारची नंबर प्लेट बदलून ती फसवणुकीसाठी वापरण्यात आली.

घटनेनंतर पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. सीसीटीव्ही फुटेज, गुप्त माहिती आणि तांत्रिक तपासाच्या आधारे



आरोपींचा मागोवा घेतला असता, आरोपी अजिंक्य उर्फ अभिजीत अनंत शिंदे (वय ३५, रा. पनवेल) याला अटक करण्यात आली. त्याच्यावर पूर्वीही खून,जबरी चोरी, चोरी असे गंभीर गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्याचा साथीदार इकबाल अब्दुलकादीर शहा (रा. चिखळे, पनवेल) हा सध्या फरार असून त्याचा शोध सुरू आहे.

या कारवाईत रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.विशाल नेहूल व पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या पथकाने महत्त्वाची भूमिका बजावली. दरम्यान, पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, कोणताही अनोळखी इसम पोलीस असल्याचे सांगून वाहन किंवा मौल्यवान वस्तू मागत असल्यास तत्काळ नजीकच्या पोलीस ठाण्यात किंवा डायल ११२ वर संपर्क साधावा.

## दिव्या ढोले यांची घर कामगारांसाठी मागणी

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील घरकामगारांना शासनाच्या विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी सरकारकडे नोंदणी करावी लागते. मात्र नोंदणी करण्यासाठी ऑफलाईन पद्धतीमुळे मोठ्या प्रमाणावर अडचणींना सामोरे जावे लागते. त्यामुळे हि नोंदणी प्रक्रिया ऑनलाइन करावी अशी मागणी भारतीय जनता पार्टीच्या राज्य कार्यकारिणीच्या विशेष निमंत्रित सदस्या दिव्या ढोले यांनी सरकारकडे केली आहे.

महाराष्ट्र घरकामगार कल्याण मंडळाची स्थापना २००८ मध्ये झाली असली तरी नोंदणी व नूतनीकरणाची प्रक्रिया अजूनही पूर्णपणे मॅन्युअल पद्धतीने सुरू आहे. घरकामगारांना मंडळाच्या कार्यालयात जाऊन अर्ज घेणे, तो भरून आवश्यक कागदपत्रे जोडणे, नियोक्त्याची सही मिळवणे, नंतर बँकेत जाऊन शुल्क भरणे आणि पुन्हा मंडळाकडे पावती जमा करणे अशा त्रासदायक प्रक्रियेत वेळ व पैसे खर्च होत आहेत. मोठ्या प्रमाणावर घरकामगार नोंदणीपासून वंचित राहतात आणि शासकीय योजनांचा लाभ मिळवू शकत नाहीत. तसेच कल्याणकारी योजनांसाठीही पोर्टल उपलब्ध करून द्यावे. या प्रणालीमुळे अचूक आकडेवारी संकलन व शासकीय लाभांचे योग्य वितरण साध्य होईल.

## नियम पाळणाऱ्या वाहनचालकांचे अभिनंदन



**पनवेल : वार्ताहर**

चालक दिनानिमित्त पनवेल शहर वाहतूक शाखेने वाहतुकीचे नियम पाळणाऱ्या वाहनचालकांचे गुलाबाचे फुल देऊन अभिनंदन केले.

चालक दिनानिमित्त पनवेल शहर वाहतूक शाखा हद्दितील पळस्पे ते टी पॉइंट दरम्यान निलेश ढाबा येथील जेएनपीटी मुख्य पॉईंटवर वाहन चालकना त्यांच्या कर्तव्या बाबत वाहतूक विभागामार्फत गुलाबाचे फुल, अल्पोपहार देऊन अभिनंदन करून भविष्यात त्यांनी अशाच प्रकारे आपले कर्तव्य जबाबदारीने करावे याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी वपोनि औदुंबर पाटील ,वाहतूक अंमलदार उपस्थित होते.

## संपादकीय

# ‘आयएमए’ आक्रमक

‘सीसीएमपी’ या ब्रिज कोर्सचा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या होमिओपॅथिक डॉक्टरांची ‘महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल’मध्ये स्वतंत्र नोंदणी करण्याच्या निर्णयाला राज्यातील लोपॅथिक डॉक्टरांचा तीव्र विरोध असून या निर्णयाविरोधात गुरुवारी राज्यभरातील डॉक्टरांनी चोवीस तासांचा टोकन संप पुकारला. नोंदणीची संबंधित अधिसूचना रद्द न केल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा या डॉक्टरांनी दिला आहे.

**‘महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल’ने होमिओपॅथीच्या विद्यार्थ्यांसाठी ‘सर्टिफिकेट कोर्स इन फॉर्माकोलॉजी’ (सीसीएमपी) असा एक वर्षाचा कोर्स सुरू केला. या सर्टिफिकेट कोर्सला ब्रिज कोर्स असेही म्हटले जाते. हा कोर्स केल्यानंतर होमिओपॅथी डॉक्टर मॉडर्न मेडिसिन म्हणजेच लोपॅथीद्वारे रुग्णांवर उपचार करू शकतील असा निर्णय महाराष्ट्र सरकारने २०१४मध्ये घेतला, मात्र महाराष्ट्र सरकारच्या या निर्णयाला ॲलोपॅथी डॉक्टरांच्या ‘इंडियन मेडिकल असोसिएशन’ या संघटनेने सुरुवातीपासून आक्षेप घेतला आहे. इंडियन मेडिकल असोसिएशनने न्यायालयात धाव घेतल्यामुळे गेली दहा वर्षे हा निर्णय प्रत्यक्षात येऊ शकला नाही. परंतु आता पुन्हा ३० जून रोजी महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलने एक अधिसूचना काढून ब्रिज कोर्स पूर्ण केलेल्या होमिओपॅथी डॉक्टरांनी कौन्सिलकडे स्वतंत्र नोंदणीसाठी अर्ज करावेत असे आवाहन केले. आतापर्यंत या कौन्सिलमध्ये फक्त लोपॅथी डॉक्टरांची नोंदणी होत होती. एक वर्षाचा आधुनिक औषधशास्त्र प्रमाणपत्र अभ्यासक्रम (सीसीएमपी) पूर्ण करणाऱ्या होमिओपॅथी डॉक्टरांच्या महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेतील नोंदणीला इंडियन मेडिकल असोसिएशनच्या डॉक्टरांचा विरोध आहे. मात्र, नोंदणीच्या अधिसूचनेला अंतरिम स्थगिती देण्यास मुंबई उच्च न्यायालयाने बुधवारी नकार दिला. त्यानंतर आयएमएच्या आवाहनानुसार गुरुवारी राज्यभरातील डॉक्टरांनी या निर्णयाविरोधात सकाळी आठपासून शुक्रवारी सकाळी आठ वाजेपर्यंतचा टोकन संप पुकारला आहे. आयएमए ही डॉक्टरांची सर्वात मोठी संघटना असून तिच्याशी संलग्न असलेल्या राज्यभरातील सुमारे एक लाख ८० हजार डॉक्टरांनी गुरुवारी संपात सहभाग घेतला. स्वाभाविकच डॉक्टरांच्या संपामुळे ठिकठिकाणी रुग्णांना अडचणींना सामोरे जावे लागले. लोपॅथीच्या डॉक्टरांकडून या मुद्यावर दीर्घ काळ विरोध सुरू असून सध्या हा मुद्दा मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित असताना राज्य सरकारने घेतलेला हा निर्णय कायद्याला धरून नाही असे आयएमएचे म्हणणे आहे. आधुनिक आरोग्यशास्त्राचे ज्ञान नसलेल्या, औषधशास्त्राचे अपुरे प्रशिक्षण घेतलेल्या डॉक्टरांकडून उपचार करून घेतल्यास रुग्णांना घातक परिणामांना तोंड द्यावे लागू शकते. प्रसंगी हा रुग्णाच्या जिवाशी खेळही ठरू शकतो याकडे लोपॅथी डॉक्टरांची संघटना लक्ष वेधत आली आहे. होमिओपॅथीच्या डॉक्टरांना मात्र एक वर्षाचा ब्रिज कोर्स त्यांनी लोपॅथीची सेवा देण्यासाठी पुरेसा वाटतो. आयएमएने मात्र, हा लढा रुग्णांच्या सुरक्षिततेसाठी व वैद्यकीय व्यवसायाच्या सन्मानासाठी असून राज्य सरकारने संबंधित परिपत्रक मागे न घेतल्यास पुढील आठवड्यात मुंबईत भव्य मोर्चा काढून बेमुदत उपोषण आंदोलनाचा इशारा दिला आहे. न्यायालयानेही अधिसूचनेला स्थगिती देण्यास नकार दिला असला तरी नोंदणी व लोपॅथीची सेवा सुरू ठेवणे हे इंडियन मेडिकल असोसिएशनच्या याचिकेवरील अंतिम निर्णयाच्या अधीन असेल हे स्पष्ट केले आहे. होमिओपॅथीच्या डॉक्टरांची होमिओपॅथी कौन्सिलमध्ये नोंदणी आहे. मग त्यांची महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमध्ये नोंदणी कशासाठी? याचा रुग्णांच्या सेवेशी काय संबंध, असा सवाल लोपॅथीचे डॉक्टर करतात. ही एमबीबीएस व त्यापुढील शिक्षण घेणाऱ्या डॉक्टरांसाठीची कौन्सिल आहे. त्यात होमिओपॅथीच्या डॉक्टरांची नोंदणी करता कामा नये यावर हे डॉक्टर ठाम आहेत.**

# महिलांसाठी ‘सशक्त’ अभियान




१७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत देशभरात राबविण्यात येणाऱ्या ‘स्वस्थ नारी, सशक्त परिवार’ या अभियानाच्या माध्यमातून महिलांना निरोगी, सशक्त आणि आत्मनिर्भर करण्याचा निर्धार केला आहे. या अभियानाविषयी ही माहिती.

महिलांना त्यांच्या घराजवळ आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे तसेच त्यांना अधिक निरोगी, सशक्त आणि आत्मनिर्भर बनवणे या उद्देशाने देशभरात १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत ‘स्वस्थ नारी, सशक्त परिवार’ हे अभियान राबविण्यात येत आहे.

महिलांचे आरोग्य व सक्षमीकरण हे कुटुंब, समाज आणि देशाच्या प्रगतीचे प्रमुख केंद्रस्थान आहे. याच उद्देशाने आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयामार्फत ‘स्वस्थ नारी, सशक्त परिवार’ हे विशेष राष्ट्रीय अभियान १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत संपूर्ण देशभर राबविण्यात येत आहे. या अभियानाचा राष्ट्रीय शुभारंभ १७ सप्टेंबर रोजी इंदौर, मध्य प्रदेश येथे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाला असून या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण देशभरात सर्वत्र करण्यात आले आहे तसेच महाराष्ट्रातील शुभारंभ सोहळा १७ सप्टेंबर २०२५ रोजी राज्यभर झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मान्यवर या सोहळ्यास बीड येथून ऑनलाईनही सहभागी झाले आहेत.

### अभियानाची उद्दिष्ट्ये

या अभियानाचा मुख्य उद्देश देशभरातील ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये महिला आणि मुलांसाठी तपासणी व विशेषज्ञ आरोग्य शिबिरांचे आयोजन आयुष्यमान आरोग्य मंदिरांमध्ये दररोज तपासणी आणि जनजागृती शिबिरांचे आयोजन ग्रामीण रुग्णालये/उपजिल्हा रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रे येथे विशेषज्ञाव्दारे तपासणी शिबिरांचे आयोजन खासगी महात्मा फुले जनआरोग्य योजना संलग्नीत रुग्णालये व क्लिनिक येथे देखील विशेषज्ञ आरोग्य शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत.

या शिबिरांमध्ये विविध आरोग्य सेवा पुरवल्या जातील, ज्यात खालील गोष्टींचा समावेश आहे.

### महिलांची आरोग्य तपासणी

उच्च रक्तदाब आणि मधुमेहाच्या निदानासाठी तपासणी करणे. तोंडाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग आणि गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाच्या निदानासाठीची तपासणी करणे. जोखीम असलेल्या महिलांसाठी क्षयरोग तपासणी किशोरवयीन मुली आणि महिलांसाठी निमिया (रक्तक्षय) तपासणी आणि समुपदेशन. आदिवासी भागातील महिलांसाठी सिकल सेल तपासणी कार्ड वाटप आणि आदिवासी भागात सिकल सेल आजाराबाबत समुपदेशन.

### माता आणि बाल आरोग्य सेवा

गर्भवती महिलांसाठी प्रसूतिपूर्व काळजी, तपासणी व समुपदेशन, हिमोग्लोबिन तपासणी, तसेच पोषण आणि काळजी यावर समुपदेशन, बालकांचे आवश्यकतेनुसार लसीकरण.

### आयुष सेवा

या अंतर्गत आयुर्वेदिक, होमिओपॅथिक, युनानी, सिध्द व नॅचरोपॅथी इ. पर्यायी उपचार पध्दतींची सेवा गरजू रुग्णांना उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

जनजागृती आणि वर्तणूक बदल संवाद

किशोरवयीन मुलींसाठी मासिक पाळीची स्वच्छता आणि पोषणाविषयी जागृती सत्रे महिला बचत गट आणि पंचायत प्रतिनिधींच्या माध्यमातून खाद्यतेल आणि साखरेचा वापर कमी करण्यावर समुपदेशन. पोषण विषयी समुपदेशन व निरोगी राहण्यासाठी मार्गदर्शन

### रक्तदान शिबिरे

१ ऑक्टोबर हा राष्ट्रीय स्वेच्छा रक्तदान दिन असून त्याअनुषंगाने राष्ट्रीय महास्वेच्छा रक्तदान या अभियानात राबविण्यात येईल. इंडियन रेड क्रॉस सोसायटी, अखिल भारतीय तेरापंथ युवक परिषद इ. संस्थांच्या साहायाने १ लाख युनिट रक्त गोळा करण्याचे ध्येय असून, रक्तदात्यांची नोंदणी करण्याचेही प्रस्तावित आहे. My Gov पोर्टलद्वारे रक्तदान प्रतिज्ञा उपलब्ध करुन देण्यात येईल.

### नोंदणी आणि कार्ड वाटप

आयुष्यमान भारत डिजीटल मिशन कार्ड, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत नोंदणी व आयुष्यमान वय वंदना कार्ड वाटप सर्व गरजू व पात्र लाभार्थ्यांना करण्यात येईल.

क्षयरोग निर्मुलनासाठी निक्षय मित्र

### स्वयंसेवकांची नोंदणी

क्षयरुग्णांना दत्तक घेऊन त्यांना पोषक आहार उपलब्ध करुन देण्यासाठी आणि क्षयरोगाविरुध्द जन आंदोलनाला पाठींबा देण्यासाठी दानशुर व्यक्ती, संस्था आणि संघटनांना निक्षय मित्र बनवून सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल. याकरिता माय भारत स्वयंसेवक अथवा इतर स्वयंसेवकाच्या मदतीने निक्षय मित्रांची नोंदणी वाढवण्यात येईल, जेणेकरुन क्षयरोग मुक्त भारताचे ध्येय साध्य करणे शक्य होईल. तपासणी शिबीरामध्ये (स्क्रिनिंग कॅम्प) आवश्यक असणाऱ्या रुग्णांना विशेषज्ञाकडून तपासणीसाठी संदर्भित केले जाईल व त्यांच्या आवश्यक त्या रक्त, लघवीच्या तपासण्या, सोनोग्राफी, क्षकिरण तपासणी व शस्त्रक्रिया मोफत व नियोजन करुन करण्यात येत आहेत.

### ७५ उपक्रमांचे आयोजन

महाराष्ट्र राज्यात १७ सप्टेंबर २०२५ रोजी ७५ उपक्रमः राबविण्यात येणार आहेत. त्यामध्ये खालील उपक्रमांचा समावेश राहील. प्राथमिक आरोग्य केंद्र, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, उपजिल्हा रुग्णालय आणि जिल्हा रुग्णालयांमध्ये आरोग्य शिबिरे, असंसर्गजन्य रोग तपासणी शिबिरे (मधुमेह, रक्तदाब, कर्करोग, हृदयरोग), मोफत चष्मा वाटपासह नेत्र तपासणी शिबिरे, दंत तपासणी शिबिरे, माता आणि बाल आरोग्य शिबिरे (प्रसूतीपूर्व तपासणी, लसीकरण), महिला आणि बालकांसाठी पोषण जागरूकता सत्रे, ठिकाणी आयुष आणि योग शिबिरे, क्षयरोग जागरूकता आणि तपासणी शिबिरे, रक्तदान शिबिरे, अवयवदान प्रतिज्ञा शिबिरे, मोफत औषध वितरण शिबिरे, निदान शिबिरे (पॅथॉलॉजी, एक्स–रे, ईसीजी), कर्करोग जागरूकता आणि तपासणी शिबिरे, मानसिक आरोग्य समुपदेशन शिबिरे, व्यसनमुक्ती जागरूकता सत्रे, किशोरवयीन आरोग्य सत्रे, शालेय आरोग्य तपासणी शिबिरे, स्वच्छता आणि स्वच्छता जागरूकता शिबिरे, ब्लॉक आणि जिल्हा स्तरावर आरोग्य मेळावे/प्रदर्शने, दुर्गम भागांसाठी टेलिमेडिसिन सल्लामसलत. या उपक्रमांव्दारे आरोग्य सुविधा मिळणार आहेत.

सहभागी संस्था व केंद्रे: राज्यातील १०,७६६ उपकेंद्रे १९३९ प्राथमिक आरोग्य केंद्रे ७९७ शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रे १,०४० शहरी सामुदायिक आरोग्य केंद्रे ३७२ ग्रामीण रुग्णालये, १०२ उपजिल्हा रुग्णालये, ८ सामान्य रुग्णालये, २२ स्त्री रुग्णालये, २ संदर्भ सेवा रुग्णालये व १९ जिल्हा रुग्णालये. राज्यातील सर्व आरोग्य केंद्रे, संस्था, वैद्यकीय महाविद्यालये व खासगी महात्मा फुले जन आरोग्य योजना संलग्न रुग्णालये सर्व खासगी वैद्यकीय व्यावसायिक संघटना यांचा अभियानात सक्रिय सहभाग लाभणार आहे. ‘स्वस्थ नारी, सशक्त परिवार’या अभियानाच्या माध्यमातून देशातील, राज्यातील स्त्रीशक्तीला आरोग्यदायी आणि अधिक बळकट करण्याचा निर्धार आहे. आपण सर्वांनी या अभियानात सक्रीय सहभागी व्हावे व महिलांनी लाभ घ्यावा अशी अपेक्षा आहे.

**–अनिल आलुरकर,**
**उपसंचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय, अमरावती**

## बदलते तंत्रज्ञान

# आयफोन १७ प्रो मॅक्सच्या कॉस्मिक ऑरेंज कलरची क्रेझ

ॲपलने त्याची आयफोन १७ सिरीज नुकतीच लॉन्च केली, ज्यात आयफोन १७, आयफोन एअर, आयफोन



१७ प्रो आणि आयफोन १७ प्रो मॅक्सचा समावेश आहे. दरम्यान, आयफोन १७ प्रो मॅक्स हा मॉडेल कॉस्मिक ऑरेंज रंगाच्या पर्यायासह लॉन्च झाला आहे. बुकिंग सुरू झाल्यापासून तीन दिवसांतच हा मॉडेल भारत आणि अमेरिकेत आउट ऑफ स्टॉक झाला आहे. आयफोन १७ मालिकेची विक्री १९ सप्टेंबरपासून सुरू होईल.

१२ सप्टेंबरपासून सुरू झालेल्या प्री–ऑर्डरच्या आधारे असा अंदाज व्यक्त केला जात आहे की, आयफोन १७ प्रो मॅक्स आयफोन १७ सिरीजमध्ये सर्वाधिक विकला जाईल. ॲपलने गेल्या वर्षीच्या तुलनेत त्याचे उत्पादन ६० टक्क्यांनी वाढवण्याचा निर्णय घेतला. आयफोन १७ प्रो मॅक्समध्ये अँटी–रिफ्लेक्टीव्ह आणि प्रोमोशन टेक्नोलॉजीसह ६.९–इंच डिस्प्ले देण्यात आला आहे. यात ४८MP+४८MP+४८MP ट्रिपल रिअर कॅमेरा सेटअप मिळतो. सेल्फी आणि व्हिडीओ कॉलिंगसाठी यात १८ मेगापिक्सेलचा सेंटर–स्टेज फ्रंट कॅमेरा देण्यात आला आहे.

ग्राहक मोठ्या प्रमाणात आयफोन १७ प्रो मॅक्सच्या कॉस्मिक ऑरेंज कलरचा पर्याय निवडत आहेत, ज्यामुळे हा कलर आउट ऑफ स्टॉक झाला आहे. हा कलर भारतातील कोणत्याही ॲपल स्टोअरमध्ये उपलब्ध नाही. त्याचप्रमाणे, ॲपलच्या वेबसाइटवरून प्रो मॅक्स मॉडेल्स पिकअपसह प्री–ऑर्डरसाठी उपलब्ध नाहीत. भारतात आयफोन १७ प्रो मॅक्सची सुरुवाती किंमत १ लाख ४९ हजार ९००पासून सुरू होतो, तर २ टीबी व्हेरिएंटची किंमत २ लाख २९ हजार ९०० रुपये आहे.

आयफोन १७ सीरिज लॉन्च झाल्यानंतर आयफोन १६ मालिकेतील मॉडेलच्या किंमती पडल्या आहेत. सध्या ॲमेझॉनवर आयफोन १६ प्रोच्या २५६ जीबी स्टोरेज व्हेरिएंटवर मोठी सूट मिळत आहे. त्याची मूळ किंमत १ लाख २९ हजार ९०० रुपये आहे, परंतु ॲमेझॉनवर आयफोन १६ सध्या १ लाख १७ हजार ९०० उपयांमध्ये उपलब्ध आहे. म्हणजेच ग्राहक २५६ जीबी मॉडेल १२८ जीबी स्टोरेज व्हेरिएंटच्या किमतीत खरदी करू शकतात, शिवाय आयफोन १६ प्रो मॅक्सच्या खरदीवरही ग्राहकांना मोठी सूट मिळत आहे. या मॉडेलची मूळ किंमत १ लाख ४४ हजार ९०० रुपये आहे, परंतु ॲमेझॉनवर हा मॉडेल फक्त १ लाख ३२ हजार ९०० रुपयांमध्ये उपलब्ध आहे.

# भारतीय वंशाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स

नासा अर्थात अमेरिकन अंतराळ संशोधन संस्थेच्या माध्यमातून अंतराळात जाणाऱ्या भारतीय वंशाच्या दुसऱ्या महिला सुनीता विल्यम्स यांचा आज जन्मदिवस आहे. त्यांचा जन्म १९ सप्टेंबर १९६५ रोजी युक्लिड, अमेरिका येथे झाला होता. त्यांनी महिला अंतराळवीर म्हणून १९५ दिवस अंतराळात राहण्याचा विक्रमदेखील केला आहे.

मेसेच्युसेट्स येथून शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर सुनिता विल्म्यस यांनी १९८८मध्ये संयुक्त राष्ट्राच्या नौदल अकॅडमीमधून फिकिल सायन्समध्ये पदवी घेतली. त्यानंतर १९९५मध्ये फ्लोरिडा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजीतून इंजिनिअर मॅनेजमेंटमध्ये एमएस केले. त्यांचे वडील दीपक पांड्या हे प्रसिद्ध डॉक्टर आहेत. ते गुजरातचे आहेत. त्यांच्या वडिलांनी १९५८मध्ये अमेरिकेत जाण्याचा निर्णय घेतला होता.

जून १९९८मध्ये सुनीता यांची नासामध्ये निवड झाली आणि प्रशिक्षण सुरू झाले. त्यांनी आतापर्यंत ३० वेगवेगळ्या अंतराळयानांमध्ये २७७० वेळा भरारी घेतली आहे. सप्टेंबर २००७मध्ये त्यांनी भारत दौरादेखील केला होता. सुनीता या सोसाइटी ऑफ एक्सपेरिमेंटल टेस्ट पायलट्स, सोसाइटी ऑफ फ्लाइट टेस्ट इंजिनिअर्स आणि अमेरिकी हॅलिकॉप्टर असोसिएशन या संस्थांशी देखील जोडलेल्या आहे.



## निमित्त


सुनीता यांचा विवाह मायकल जे विलियम्स यांच्याशी झाला असून तेदेखील अंतराळ क्षेत्राशी निगडीत आहेत. सुनिता यांना २००८मध्ये भारत सरकारकडून विज्ञान आणि अभियांत्रिक क्षेत्रातील कामगिरीसाठी पद्मभूषण पुरस्कार देऊन सन्मानित केले गेले आहे. त्यांना आतापर्यंत नेव्ही कमेंडेशन मेडल (२), नेव्ही अँन्ड मरीन कॉर्प अचिव्हमेंट मेडल, ह्यूमॅनिटेरियन सर्विस मेडल अशा विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे.

अंतराळात जाणाऱ्या सुनीता या भारतीय वंशाच्या दुसऱ्या महिला असून अंतराळाची ओढ असणाऱ्या तरूणाईसाठी त्या एक प्रेरणास्रोत आहेत. दरम्यान, २०१२मध्ये सुनीता आंतरराष्ट्रीय इंटरनेशनल स्पेस स्टेशनच्या प्रवासादरम्यान अंतराळात ट्रायथलॉन पूर्ण करणाऱ्या पहिल्या महिला ठरल्या. यादरम्यान, त्यांनी वेट लिफ्टिंग मशीन वापरून पोहण्याची नक्कल केली आणि हार्नेसला बांधलेल्या ट्रेडमिलवर धावल्या होत्या.

अमेरिकी अंतराळ संस्था नासामध्ये कार्यरत असणाऱ्या भारतीय वंशाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स यांनी दुसऱ्यांदा अंतराळात भरारी घेतली आहे. त्यांचे सहकारी बुच विल्मोर यांच्यासह बोइंगच्या स्टारलाइनर अंतराळयानातून आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकामध्ये ५ जून रोजी (आयएसएस) पोहचले, परंत, आता सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर पुन्हा पृथ्वीतलावर केव्हा परतणार याबाबत नासाने कोणतीही माहिती दिलेली नाही. स्टारलाइनर या त्यांच्या यानात हीलिअम गळती झाल्याने त्यांचा परतीचा प्रवास रखडला असल्याची चर्चा आहे.

नासामधील भारतीय वंशाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर हे आंतरराष्ट्रीय अंतराळस्थानकावर अडकले आहेत. त्यांच्या यानात बिघाड झाल्याने दोघांचाही परतीचा प्रवास लांबला आहे. दोन्ही अंतराळवीर २०२४च्या अमेरिकेतील अध्यक्षीय निवडणुकीपूर्वी पृथ्वीवर परत येणार नाहीत, परंतु असे असले तरी दोन्ही अंतराळवीरांना अंतराळस्थानकातून मतदानाचा हक्क बजावता येणार आहे. **(साभार : इंटरनेट)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# दातांना खड्डे पडले, किड लागली? हे करा

नेहमी गोड खाल्ल्यामुळे, चहा–कॉफीचे अतिसेवन यामुळे दात जास्त प्रमाणात किडू लागतात. दातांमध्ये कॅव्हिटी झाल्यास बॅक्टेरिया दातांच्या नसांपर्यंत पोहोचून पू तयार होतो किंवा इन्फेक्शन होऊ शकते. जबड्याच्या खालच्या बाजूचे दात जास्त प्रमाणात किडतात. अनेकदा दातांच्या मध्यभागी खड्डासुद्धा तयार होतो.



ज्याला कॅव्हिटीज असं म्हणतात. दातांमध्ये अन्नकण अडकून राहतात ते बराच काळ तसेच राहिल्यानं दातांना किड लागते. तोंडात वाढणारे बॅक्टेरिया व्यवस्थित स्वच्छ न झाल्यामुळे प्लाक आणि टार्टर तयार होते, ज्यामुळे कॅव्हिटीज होतात. किडलेले दात पुन्हा चांगले होण्यासाठी हजारो रुपये खर्च करावे लागतात. दात किडू नयेत यासाठी डॉक्टरांनी काही सोपे उपाय सांगितले आहेत.

प्रसिद्ध डॉक्टर इले फिलिप्स यांनी काही सोपे उपाय सांगितले आहे. या उपायांचा अवलंब करून तुम्ही दात किडण्याची समस्या टाळू शकता. आपली लाळ दातांसाठी नॅच्युरल प्रोटेक्शन आहे. जी दातांच्या कमकुवत भागांना पुन्हा मजबूत करत. ज्यामुळे दात सुरक्षित राहतात. जास्तवेळ तोंड कोरडं पडल्यामुळे कॅव्हिटीज जास्त वाढतातम ज्यामुळे पाणी अधिक प्यावं लागतं आणि तोंड कोरडं पडतं.

### जायलीटॉल च्युईंगम

तुमचं तोंड कोरड पडत असेल तर जायलीटॉल शुगर फ्री च्युईंग गम फायदेशीर ठरतं. ही एक नॅच्युरल शुगर आहे जे बॅक्टेरियाज पचवू शकत नाही. याव्यतिरिक्त च्युईंग चावल्यानं लाळेचा स्त्राव वाढतो. दात धुवून स्वच्छ होतात आणि त्यात नवीन मिनरल्स जमा होतात.

### चांगली टुथपेस्ट निवडा

कॅव्हिटीज रोखण्यासाठी आणि दातांना मजबूत ठेवण्यासाठी टुथपेस्ट, माऊथवॉशचा वापर खूप गरजेचा आहे. अशा माऊथवॉशची निवड करा, ज्यात सोडियम फ्लोराईड असेल. हा माऊथवॉश दातांच्या इनॅमेलवर चांगला परिणाम करतो. दिवसातून दोनदा वापर केल्यास कॅव्हिटीज टाळता येतात.

### खाण्यापिण्याची वेळ योग्य ठेवा

कॅव्हिटीज फक्त गोड खाल्ल्यानं होत नाहीत तर सतत खाल्ल्यामुळे पण होते. जर तुम्ही सतत काही ना काही खात असाल तर दातांवर एसिड अटॅक होतो. ज्यामुळे दातांना दुरूस्त होण्यासाठी वेळ मिळत नाही. यासाठी खाण्यापिण्यात २ ते ३ तासांचं अंतर असायलाच हवं.

# नेरळमध्ये भीषण आग

## नागरिक व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या धाडसामुळे मोठा अनर्थ टळला

**नेरळ : प्रतिनिधी**



कर्जत-कळ्याण राज्य मार्गालगत नेरळ येथील श्री दत्त आशिष कॉ-ऑप हाउसिंग सोसायटीमधील पहिल्या मजल्यावरील डॉ. मिलिंद पटवर्धन यांच्या घराला गुरुवारी (दि. १८ सप्टेंबर) पहाटे अचानक आग लागली. घरातील सर्व साहित्य जळून खाक झाले असून सुदैवाने जीवितहानी टळली आहे.पहाटे राजमाता जिजाऊ भोसले तलावावर मॉर्निंग वॉकसाठी आलेल्या नागरिकांना इमारतीतून सलग चार स्फोटांचे आवाज ऐकू आले आणि धुराचे लोट दिसताच त्यांनी तत्काळ ग्रामपंचायत व पोलिसांना कळवले.

डॉ. मिलिंद एकनाथ पटवर्धन हे आपल्या नातेवाईकांकडे गेले होते त्यामुळे घर बंद होते.पहाटे सहा वाजण्याच्या सुमारास नेरळ राजमाता जिजाऊ भोसले तलाव येथे मॉर्निंगवाक साठी आलेल्या नागरिकांना ही घटना दिसताच या नागरिकांसह,सर्व प्रथम नेरळ महावितरण व ग्रामपंचायत कर्मचारी,पोलिस प्रशासनाने धाव घेतली.इमारतीतील रहिवाशी देखील स्फोटाच्या आवाजाने बाहेर आले. दरम्यान, आपत्कालीन क्रमांक १०० व १०१ वर वारंवार कॉल करूनही अग्निशमन विभागाकडून प्रतिसाद न मिळाल्याने वाहन घटनास्थळी पोहोचले नाही. प्रशासनाच्या या हलगर्जीपणाबद्दल नागरिकांत तीव्र संताप व्यक्त होत आहे.

आग लागण्याचे कारण दरवाज्याच्या कडेला असलेल्या इलेक्ट्रिक बोर्डातील शॉर्टसर्किट असल्याचे बोललेले जात आहे. या आगीच्या दाहकतेने घराचा दरवाजा जळून बाहेर पडला आणि त्यामुळेच नागरिकांना आत प्रवेश करता आला.ग्रामपंचायत कर्मचारी, पोलीस व स्थानिक नागरिकांनी धाडसाने घरात प्रवेश करून बादल्यांतून पाणी टाकत अथक प्रयत्न करून आग विझवली. यामुळे शेजारील फ्लॅट्स सुरक्षित राहिले.घरातील सोफा, पुस्तके, इलेक्ट्रॉनिक साहित्य, फर्निचर आदी सर्व जळून गेले. किचनमध्ये नुकतीच आग पसरली होती, तर बेडरूममध्ये धुरामुळे भिंती काळवंडल्या होत्या. मात्र, गॅस सिलेंडर सुरक्षितपणे बाहेर काढल्याने मोठा स्फोट टळला.

# तळा बाजारात मासळीची आवक वाढली; खवय्यांची चंगळ

**तळा : प्रतिनिधी**



तळा मच्छी बाजारात मच्छीची आवक वाढल्याने खवय्यांची चंगळ झाली आहे . तळा तालुका हा डोंगराळ भाग असला तरी पश्चिमेकडील भाग हा खाडीकिनारी असून या भागातील रहाटाड,मांदाड,कुडे,रोवळा,वाशी हवेली,माजगाव आदी गावे खाडी किनारी असल्याने याभागातील कोळीबांधव व मच्छीमार तळा बाजारात मोठ्या प्रमाणात मच्छी विक्रीसाठी येत आहेत.

त्यामधे बोंबील,कोळंबी, मांदेली,खेकडी,गोडी चिंबोरी,शिंगटी इत्यादी मच्छीची आवक चांगलीच वाढली आहे. तसेच काही प्रमाणात पापलेट व सुरम ही येत आहे.काही मच्छीचे भाव सर्व सामान्यांना परवडणारे आहेत तर काही मच्छीचे भाव वाढलेले आहेत.

त्यातच वाट्यावरही मच्छी विक्री केली जात आहे.वाट्याचे भाव पाहीले तर ५० रूपायांपासून सुरू होतात ज्या पध्दतीची मच्छी आहे.त्या पध्दतीने वाट्यावर मच्छी मिळते.१००/ रूपये २०० रूपये असेही भाव आहेत. तसेच पापलेट ६०० ते १००० रूपये कीलो,सुरमई ५०० ते ८०० रूपये कीलो,कोळंबी ४०० रूपये किलो असे भाव चालू आहेत.सध्या मच्छीची बाजारात आवक वाढली असल्याने व दर परवडणारे असल्याने खवय्यांचा मच्छी खरेदीकडे अधिक कल वाढल्याचे पहावयास मिळत आहे.

राम प्रहर
वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा

# होमिओपॅथी डॉक्टरांना ॲलोपॅथी सराव करण्यास विरोध



**अलिबाग : प्रतिनिधी**

होमिओपॅथी डॉक्टरांना ॲलोपॅथी सराव करण्यास दिलेल्या परवानगी विरोधात इंडीयन मेडीकल असोसिएशननी गुरवारी एक दिवसाच्या लाक्षणिक बंदची हाक दिली होती. या आवाहनाला रायगड जिल्ह्यातील डॉक्टरांनी उत्फुर्त प्रतिसाद दिला. आपत्कालिन वैद्यकीय सेवा वगळता, जिल्ह्यातील बहुतांश खाजगी दवाखाने, रुग्णालये बंद ठेवण्यात आली होते. आयएमए अलिबाग शाखेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना यावेळी निवेदन देण्यात आले.

जिल्हाधिकारी यांच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांनी हे निवेदन स्विकारले, यावेळी आयएमए अलिबागचे अध्यक्ष डॉ विनायक पाटील, सचिव डॉ. राहूल म्हात्रे, खजिनदार डॉ. समीर नाईक, डॉ. अरुण गवळी आणि डॉ. सचिन जायभाय उपस्थित होते. त्यापुर्वी जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील हिराकोट तलाव येथे आयएमएशी सलग्न सर्व डॉक्टरांनी निदर्शने केली.

राज्यसरकारने सिसिएमपी अभ्यासक्रम उत्तीर्ण करणाऱ्या होमिओपॅथिक डॉक्टरांना ॲलोपॅथी सराव करण्यास मान्यता देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाला इंडीयन मेडीकल असोसिएशनने विरोध दर्शवला. या निर्णयामुळे आरोग्य सेवेच्या सुरक्षितता आणि गुणवत्तेला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. ज्याचा आरोग्यव्यवस्थेवर तसेच रुग्णांवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे शासनाने हा निर्णय मागे घ्यावा अशी मागणी यावेळी करण्यात आली.

एमबीबीएस अभ्यासक्रम उत्तीर्ण करण्यासाठी साडे पाच वर्षांचा कालावधी लागतो, ज्यात १९ विषयांचा सखोल अभ्यास करावा लागतो. अभ्यासक्रम पुर्ण केल्यावर वैद्यकीय अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्यांना एक वर्षाची इनटर्नशीप करावी लागते. या उलट सिसिएमपी अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी हा एक वर्षाचा कालावधी लागतो, आठवड्यातून दोन दिवसच हा शिकवला जातो. त्यामुळे त्यामुळे इतक्या कमी कालावधीत वैद्यकीय ज्ञान, कौशल्य आणि निर्णयक्षमता विकसित होऊ शकत नाही. यामुळे रुग्णांना धोका निर्माण होऊ शकतो, आरोग्य सेवेचा दर्जा घसरू शकतो. आरोग्य व्यवस्थेत गोंधळाची स्थिती निर्माण होऊ शकते.

त्यामुळे सिसिएमपी डॉक्टरांना महाराष्ट्र मेडीकल कॉन्सिलमध्ये नोंदणी देण्याचा निर्णय तात्काळ स्थगित करावा, उच्च न्यायालयात दाखल याचिकेवर निर्णय होत नाही तोवर या निर्णयाची अमंलबजावणी करू नये आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी केवळ एमबीबीएस अभ्यासक्रम उतीर्ण होणाऱ्या डॉक्टरांना नोंदणी द्यावी अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# माणगाव पोलीस दलाकडून हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र अंतर्गत वृक्षारोपण उपक्रम



**माणगाव : बातमीदार**

ओझोन थर संरक्षण दिनाचे औचित्य साधत मंगळवार दि.१६ सप्टेंबर रोजी माणगांव पोलिसांकडून रायगडच्या पोलीस अधिक्षक आंचल दलाल आणि अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवतरे यांच्या निर्देशानुसार वृक्षारोपण उपक्रम हिरहिरिने सुरु झाला.

याप्रसंगी उपविभागीय पोलिस अधिकारी माणगांव पुष्कराज सुर्यवंशी यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या नेतृत्वात हा कार्यक्रम राबविण्यात आला. सहाय्यक पो.नि. नरेंद्र बेलदार यांनी नव्या भरती झालेल्या तरुणांसह स्वतः श्रमदान करत या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला.

वृक्षारोपणाचा पहिला टप्पा पोलिस स्टेशन आवारात, गजानन महाराज मंदिरासमोर तसेच विकास कॉलनी परिसरात घेण्यात आला. माणगांव शहरात एकूण ४७५ वृक्ष लागवड करण्यात येणार आहे. त्यामध्ये महाराष्ट्र राज्य फुल असलेले ताम्हण वृक्ष, आवळा, कांचन आणि खैर आदी वृक्षांची लागवड करण्याचे उद्दिष्ट असून ५० रोपटी लावून वृक्षारोपणास सुरुवात करण्यात आली आहे. ही सर्व झाडे औषधी, खाद्य, सावली, इंधन, शोभा, माती संरक्षण, कार्बन शोषण अशा विविध पद्धतींनी माणूस, प्राणी, पक्षी आणि संपूर्ण पर्यावरणाला थेट किंवा अप्रत्यक्ष उपकारक आहेत.या मोहिमेच्या अनुषंगाने जिल्ह्यात १० हजार वृक्ष लागवड करण्यात येणार आहेत, त्यातील माणगांव उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालयाला २०० तर माणगांव पोलिस ठाण्यास २७५ अशा एकूण ४७५ वृक्षांची लागवड करण्याचे लक्ष्य देण्यात आले आहे.

वन्यजीव अभ्यासक शंतनु कुवेसकर आणि शुभंकर वनारसे यांनी विशेष सहकार्य केले आहे. ४५ महिला व पुरुष पोलिस अंमलदार उपस्थित होते.

# माणगाव टीएमसी कॉलेजमध्ये करिअर कट्टा कार्यक्रम उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील जे.बी. सावंत एजुकेशन सोसायटीचे टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेज माणगाव येथे महाराष्ट्र राज्य उच्च तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र राज्य माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्यावतीने विद्यार्थ्यांना करिअरच्या संधी व तंत्रज्ञानाचा वापर कसा करावा याविषयी करिअर कट्टा अंतर्गत संवाद उपक्रम गुरुवार दि. १८ सप्टेंबर२०२५ रोजी उत्साहात संपन्न झाला.

यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाराष्ट्र राज्य माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र अध्यक्ष यशवंत शितोळे यांनी विद्यार्थ्यांशी सवांद साधला.

यावेळी यशवंत शितोळे मार्गदर्शन करताना करिअर कट्टा अंतर्गत उपलब्ध असणारे विविध उपक्रम,कोर्सेसच्या संधी त्याचप्रमाणे तंत्रज्ञानाचा फायदा कसा करावा या विषयी विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॉलेजच्या प्राचार्या डॉ. अमृता देशमुख उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.अशोक मोरे यांनी केले. सदर कार्यक्रमास प्रा.डॉ. शिनगारे,प्रा.भारत पवार,प्रा. डॉ.नितीन मुटकुळे,सर्व शिक्षकवर्ग,शिक्षकेतर कर्मचारी वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते.

शेवटी प्रा.डॉ.नितीन मुटकुळे सर्व उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची उत्साहात सांगता केली.



# रसायनीत आरोग्य प्रशिक्षण जनजागृती

**मोहोपाडा : प्रतिनिधी**



प्रकल्प निरामाया पाताळगंगा,हुमाना पीपल टू पीपल इंडिया संस्था,मर्क स्पेशालिटीज प्रायव्हेट लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने रसायनी पाताळगंगा तसेच इतर तीन ठिकाणी आरोग्य जनजागृती वर सक्रियरित्या कार्य सुरु आहे. या कार्यात प्रकल्प निरामाया पाताळगंगा परियोजनेचे प्रोजेक्ट लिडर पिंटू कुमार शर्मा, हेल्थ एक्सीलेटर मनीषा गणेश खंडागळे, कम्युनिटी मोबिलायझर तनिष्का तुलसीदास कर्णेकर हे कामगिरी बजावत आहेत. महिलांचे व किशोरवयीन मुलींचे गट तयार करून त्यांना दर महिन्याला आरोग्य प्रशिक्षण देणे तसेच किशोरवयीन मुलींसाठी दर महिन्याला मोफत सॅनिटरी पॅड वाटप करण्यात येत आहे. आशा वर्कर,आंगणवाडी सेविका व एन एम यांच्या साठी वावेघर आंगणवाडी येथे एनसीडी अवेअरनेस सेशन घेण्यात आले. या सेशन साठी आपटा पिएचसी येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. उन्नती चव्हाण यांना आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी अतिशय उत्तम प्रकारे प्रशिक्षण दिले.

त्याचप्रमाणे रसायनीतील सावळा ग्रुप ग्रामपंचायत येथे किशोरवयीन मुलींसाठी व्यक्तिगत स्वच्छता या विषयावर प्रशिक्षण देण्यात आले. वावेघर ग्रुप ग्रामपंचायत येथे मोफत आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले. या आरोग्य शिबिरामध्ये सरपंच गीतांजली गाताडे, डॉक्टर उन्नती चव्हाण, या सर्वांनी उपस्थिती दाखवली.


**पनवेल महानगरपालिका**

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

कार्यालय-आयुक्त मुख्यालय, २ रा मजला, देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल- ४१०२०६
दुरध्वनी क्र- ०२२-२७४५८०४०/४१/४२ Email Id: panvelcorporation@gmail.com

**जाहिर निविदा सुचना**

| अनु.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १. | निविदा/पमपा/मातंवि २४२४/ प्र.क्र.०३/ २०२५-२६ | Supply Installation dedicated line, private circuit, and data line (Primary and secondary) at Panvel Municipal Corporation Headquaters and Panvel Municipal Corporation Ward Offices and Schools, other Offices (३ वर्षांकरिता) |

या निविदेबाबतची विस्तृत माहिती शासनाच्या www.mahatenders.com या संकेतस्थळावर दि. १९/०९/२०२५ पासून उपलब्ध होईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
उप आयुक्त (मातंवि)
पनवेल महानगरपालिका

जा.क्र :-पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र. ४६१/४७४/२०२५
दिनांक :- १८/०९/२०२५


# रोहा बेलवाडी जंगल भागातील गावठी दारूभट्टी उद्ध्वस्त, दोघांवर गुन्हा दाखल

**धाटाव : वार्ताहर**

रोहा पोलिसांनी मौजे बेलवाडी गावच्या हद्दीतील जंगल भागात पाण्याच्या ओहळाजवळ सुरु असलेली गावठी दारूची भट्टी उद्ध्वस्त करून दोन इसमांवर गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी केलेल्या कारवाईत तब्बल १ लाख १४ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून जागेवरच नष्ट केला आहे.

विश्वासाई माहितीच्या आधारे पोलिस स्टाफ व दोन पंचांच्या उपस्थितीत खाजगी वाहनाने मौजे बेलवाडी येथे दुपारी १.१० वाजता पोहचून सुमारे ७०० मीटर जंगल भागात तपासणी करण्यात आली. तेथे पाण्याच्या ओहळाशेजारी लाकडी झोपडीमध्ये दारू पाडण्यासाठी लागणारे रसायन, लाकूड, भांडी, ६ प्लास्टिक पिंप, २ लोखंडी पिंप असा मोठा साठा आढळून आला.

पोलिसांनी पंचासमक्ष पंचनामा करून एकूण १६,००० लिटर रसायन अंदाजे १ लाख १२हजार रुपये आणि २० लिटर दारू दोन हजार रुपये असा एकूण १,१४,००० रुपयांचा प्रोव्हेशनचा माल जप्त केला. सदर भट्टी डोंगरातील अवघड भागात असल्याने पंचांच्या उपस्थितीत तोडून फोडून नष्ट करण्यात आली.या ठिकाणी आढळलेल्या दोन व्यक्ती सुनील हरिश्चंद्र होगाडे (वय २५) आणि गणेश रामचंद्र होगाडे (वय २४, रा. बेलवाडी, ता. रोहा) यांना ताब्यात घेउम त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करून कारवाई सुरू आहे.


MAHAVITARAN

**e-TENDER NOTICE**

e-bid offers are invited from eligible bidder for following works :

| Tender No | Name Of Work | Tender Amt | EMD Amt in ₹ | Tender form fees including GST in ₹ | Online Sale Period |
|---|---|---|---|---|---|
| CE/BNDUZ/ T-04/2025-26 | SUPPLY OF VARIOUS RATINGS LT HRC FUSE LINKS (250 Amp, 315 Amp, 400 Amp) &FUSE BASE (250 Amp & 400 Amp) FOR THANE URBAN CIRCLE, PEN AND VASHI CIRCLE UNDER BHANDUP URBAN ZONE. | Rs. 93.56 Lakhs | ₹ 93,577/- | ₹ 5900/- | 16.09.2025 to 30.09.2025 up to 14.00hrs |
| CE/BNDUZ/ T-05/2025-26 | SUPPLY OF VARIOUS RATINGS LT HRC FUSE LINKS (630 Amp) & FUSE BASE (630 Amp) FOR THANE URBAN CIRCLE, PEN AND VASHI CIRCLE UNDER BHANDUP URBAN ZONE. | Rs. 95.64 Lakhs | ₹ 95,640/- | ₹ 5900/- | 16.09.2025 to 30.09.2025 up to 14.00hrs |

The e-tender document is being available on our website www.mahadiscom.in/eTender/etender Contact person, Exe. Engineer(I) Tel. No. 8879625111, MSEDC Ltd, Bhandup Urban Zone "Vidyut", L.B.S Marg, Bhandup(w) Mumbai-78. E-mail- cebhandup1@gmail.com.

Sd-
CHIEF ENGINEER (BUZ)

# महाराष्ट्र वनविभागातर्फे जनजागृती प्रदर्शन

## वनमंत्री गणेश नाईकांच्या हस्ते उद्घाटन

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र वनविभागाच्या वतीने नवी मुंबई येथील सिडको प्रदर्शनी केंद्रात एक दिवसीय वनोपज-आधारित जनजागृती प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली या प्रदर्शनाचे उद्घाटन संपन्न झाले.याप्रसंगी वनविभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



यावेळी वनमंत्री गणेश नाईक यांनी प्रदर्शनातील विविध स्टॉल्सना भेट देऊन पाहणी केली. वनसंपदा आणि त्यातून मिळणाऱ्या उत्पादनांविषयी लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा या प्रदर्शनाचा मुख्य उद्देश होता. प्रदर्शनामध्ये वानोपज उत्पादने, महाराष्ट्रातील कांदळ वनांची माहिती, व्याघ्र प्रकल्प, कांदळवन संवर्धन, प्रस्तावित कांदळवन इत्यादींची माहिती देणारे स्टॉल मांडण्यात आले होते. महाराष्ट्र फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन, सह्याद्री, पेंच,ताडोबा व्याघ्र प्रकल्प, बांबू डेव्हलपमेंट बोर्ड वनविभागाच्या या खात्यांनी भाग घेतला. प्रदर्शनाला नागरिकांनी मोठ्या संख्येने भेट दिली.

या उपक्रमांमुळे वनसंवर्धन आणि वनोपजांना बाजारपेठ मिळवून देण्याला बळ मिळेल, असे मत मंत्री गणेश नाईक यांनी व्यक्त केले.याच कार्यक्रमात वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते 'महाबांबू कल्प' ई-कॉमर्स वेबसाइट आणि मोबाइल पचे डिजिटल लाँचिंग, 'वनामृत' या ब्रँडखालील जांभूळ मधाचे अनावरण आणि 'टिशू कल्चर लॅब'चे उद्घाटन करण्यात आले. या उपक्रमांमुळे वनसंवर्धन, वनोत्पादन वाढ आणि वनोपजांना बाजारपेठ मिळवून देण्यास मदत होईल, असा विश्वास देखील वनमंत्री गणेश नाईक यांनी याप्रसंगी व्यक्त केला .

महाराष्ट्राला विस्तीर्ण कांदळवन क्षेत्र लाभले असून या क्षेत्रामध्ये पर्यटन विकास करण्याचे नियोजन असल्याची माहिती मंत्री गणेश नाईक यांनी दिली

# आसूडगाव आगारात १०५ कर्मचाऱ्यांचे रक्तदान



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका परिवहन कर्मचारी आणि एनएनएमटी श्रमिकसेना यांच्या माध्यमातून वनमंत्री गणेश नाईक यांच्या वाढदिवसानिमित्त यंदा सामाजिक बांधिलकी जपत मंगळवार (दि. १६) रोजी आसूडगांव बस आगारात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी,परिवहन सेवेतील १०५ कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले. या शिबिरात तज्ज्ञ वैद्यकीय डॉक्टरांमार्फत तपासणी करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिकेचे परिवहन व्यवस्थापन हे देशातील तत्पर व उत्तम प्रवासी सेवा देणारे साधन म्हणून नावाजले जात असून, पुन्हा एकदा काळाची गरज लक्षात घेता 'रक्तदान हेच जीवनदान, रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान' उपक्रम राबवला. दरम्यान, रक्तदान शिबिराच्या कार्यातून वैश्विक समाजाची संकल्पना दृढ होत आहे. दुसऱ्यासाठी जगणे, हेच खरे जगणे आहे. या कार्यक्रमातूनच आपण आपल्या कार्याची सुरुवात करा', कार्यक्रमाला आलेले सर्व चालक- वाहक तरुण असून त्यांच्या कार्याचा धडा संपूर्ण महाराष्ट्राने घ्यावा, असा आहे. आपले कार्य पाहून देवालाही आपणाला जन्म दिल्याचा अभिमान असेल', असे कौतुक असूडगांव बस डेपोचे किशोर पाटील यांनी केले.

या शिबिराप्रसंगी एनएनएमटी श्रमिकसेना असूडगाव आगाराचे अध्यक्ष संजय कोळी, मध्यवर्ती कमिटी अध्यक्ष किशोर पाटील, दिलीप भोईर, सतीश कोळी, भरत कोळी, भाऊसाहेब पगारे, रुपेश कोळी, अक्षय कदम, गणेश कोळी, देवानंद म्हात्रे, गजानन कोळी, नवीन पाटील, जयेश कोळी, अमोल भोसले, विलास गायकवाड, हणमंत अर्जुने, अच्युत म्हात्रे, मनोहर भोये, मुजाहीत तडवी दिलीप अमर भगत यांच्यासह परिवहन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नवी मुंबई महानगरपालिका अभियंत्यांनी उत्साहात साजरा केला अभियंता दिन

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेच्या अभियंत्यांची गुणवत्ता चांगली असून झपाट्याने बदलत असलेल्या आजच्या जगात प्रत्येकाने आपले ज्ञान नव्या तंत्रज्ञानाशी सुसंगत अद्ययावत करण्याची गरज असल्याचे सांगत नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी अभियंता दिनाच्या शुभेच्छा दिल्या व नवी मुंबई शहराच्या विकासात अभियंत्यांचे सर्वाधिक योगदान आहे असे मत व्यक्त केले.



आधुनिक भारताचे विश्वकर्मा म्हणून संबोधल्या जाणाऱ्या भारतरत्न सर एम.विश्वेश्वरय्या यांचा जयंतीदिन संपूर्ण देशात अभियंता दिन म्हणून साजरा करण्यात येतो. यानिमित्त मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात आयोजित कार्यक्रमाचा प्रारंभ सर एम.विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेला अभिवादन करुन दीपप्रज्वलनाने झाला. याप्रसंगी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे, यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

नामांकित प्रेरणादायी व्याख्याते आनंद मुन्शी आणि इतर अधिकारी, अभियंते व कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी कोणत्याही शहराची प्रगती ही अभियंत्यांच्या उत्तम कामामुळे होत असते असे सांगत नवी मुंबई महानगरपालिकेतील अभियांत्रिकी विभाग लोकाभिमुख काम करणारा व तात्काळ प्रतिसाद देणारा असल्याबद्दल प्रशंसा केली. शहर अभियंता शिरीष आरदवाड यांनी मागील वर्षभरात करण्यात आलेल्या कामांचा आढावा घेत आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली सर्वच कामांना गती मिळाली असल्याचे

### अभियंत्यांचा सन्मान

यावेळी वाशी से.१२ येथील स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचा उल्लेखनीय प्रकल्प पूर्ण करणारा अभियंता समुह अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे, उपअभियंता जितेंद्र नाईक, सहा.अभियंता हेमंत घाडगे यांचा तसेच बेलापूर टर्शिअरी ट्रिटमेंट प्लान्ट हा प्रकल्प मुदतपूर्व पूर्ण करणारा अभियंता समूह अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे, कार्यकारी अभियंता वसंत पडघन, उपअभियंता संतोष उनवणे, स्वप्निल देसाई, सहा.अभियंता अभय गावित विद्युत अभियंता प्रवीण गाडेंचा यांना सन्मानित केले.

# भारतीय मजदूर महासंघाच्या कोअर समितीचे अभ्यास शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय मजदूर संघाशी संलग्न असलेल्या सर्व महासंघाच्या कोअर समितीचे पाच दिवसाचे अभ्यास शिबिर कोटा (राजस्थान) येथे सुरू आहे. या अभ्यास वर्गासाठी सर्व उद्योगातील देशातून १२० कार्यकर्त्यांचा अभ्यास वर्ग १९ सप्टेंबरपर्यंत सुरू आहे.

या अभ्यासासाठी पोर्ट अँड डॉकचे अखिल भारतीय अध्यक्ष श्रीकांत राय व महामंत्री सुरेश पाटील तसेच पोर्टचे अखिल भारतीय प्रभारी चंद्रकांत धुमाळ सहभागी झाले आहेत. पाच दिवसाच्या अभ्यास वर्गात बीएमएसची रीती निती पद्धती व कार्यकर्ता विकास याचे प्रशिक्षण मिळणार आहे.

दरम्यान, अभ्यास वर्गात बुधवारी (दि. १७) विश्वकर्मा जयंती साजरी करण्यात आली. अखिल भारतीय अध्यक्ष हिरेनभाई पंड्या, जनरल सेक्रेटरी रवींद्र हिमते, संघटनमंत्री बी सुरेंद्र व मार्गदर्शक सचिन नारायण, केरळ यांना महाराष्ट्र राज्य औद्योगिक कामगार महासंघ व भा. म. संघ महाराष्ट्र प्रदेश यांच्या वतीने प्रतिमा प्रदान करण्यात आली.

# अनेक सामाजिक उपक्रमांनी मंत्री गणेश नाईक यांचे अभीष्टचिंतन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी, नवी मुंबई यांच्या माध्यमातून पालिकेचे माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत यांच्या नेतृत्वाखाली युवा नेते निशांत भगत यांच्या संयोजनाखाली गणेश नाईक यांच्या वाढदिवसानिमित्ताने सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, क्रीडा सांस्कृतिक अशा विविधांगी १०० समाजोपयोगी उपक्रमांचा पंधरवडा साजरा करण्यात येत आहे.

१५ सप्टेंबर रोजी मंत्री नाईक यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रमांचा शुभारंभ करून पंधरवडा कार्यक्रमांचा श्री गणेशा करण्यात आला.यानिमित्ताने आयुष्यमान कार्ड वाटप, ज्येष्ठ नागरिकांना ओळखपत्राचे वाटप, ज्येष्ठांचा सन्मान, स्वर्गीय धर्मवीर आनंद दिघे साहेब कल्याणकारी योजना अंतर्गत रिक्षाचालकांसाठी शिबिर इ. या उपक्रमांस वैजयंती भगत, फशीबाई भगत, रुपाली भगत आणि संदीप भगत यांचे सहकार्य लाभले.



# उरण येथे भगवान विश्वकर्मा जयंती साजरी

**उरण : वार्ताहर**

भगवान विश्वकर्मा यांची जयंती बुधवार ( दि. १७) रोजी होती. ते जगाचे शिल्पकार आणि निर्माता मानलेजातात.हे शिल्पकार आणि अभियत्यांचे अराध्य दैवत आहेत. कारखाने अणि औद्योगिक ठिकाणी यंत्र अणि अवजारांची पूजा केली जाते.उरण शहरातील आनंद नगर येथे नव्याने आधुनिक बिल्डिंगचे बांधकाम सुरु होत असलेली ग्रँड उरण सेन्ट्रल(अल्टोफिल )बिल्डिंग मध्ये या वर्षी बसुशेठ यांच्यामार्गदर्शनाखाली बुधवार ( दि. १७ ) रोजी भगवानविश्वकर्मा जयंती साजरी करण्यात आली .



भगवान विश्वकर्मा यांच्या प्रतिमेस हार व् फुलांनी सुंदर सजावट करण्यात आली. सकाळी बसुशेठ यांच्या हस्तेपूजन,व् आरती करण्यात आली. आलेल्या सर्व भक्तांनीतीर्थ प्रसादाचा लाभ घेतला. त्याच प्रमाणे महाप्रसादाचेआयोजन करण्यात आले .या वेळी राजेश म्हात्रे,रितेश म्हात्रे,राकेश म्हात्रे ,बसु शेठ आदी मान्यवरांनी उपस्थित राहून दर्शन घेतले.

# अजिवली-भातान वीज वाहिनी विलगीकरण पूर्ण

**नवी मुंबई : बातमीदार**

आर.डी.एस.एस. योजनेअंतर्गत मंजूर असलेले अजिवली-भातान २२ केव्ही वीज वाहिनी विलगीकरणाचे काम दिनांक १६ सप्टेंबर २०२५ रोजी यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले. सदर काम पूर्ण झाल्यामुळे आजीवली-भातान परिसरातील ग्राहकांना अखंडित वीज पुरवठा सुनिश्चित होणार आहे.



या कामाच्या अनुषंगाने यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे महामार्ग पनवेलजवळ दुपारी २ ते ३ या वेळेत वाहतूक बंद ठेवण्यात आली होती. प्रत्यक्ष कामासाठी तीन ते चार तास लागण्याचा अंदाज वर्तविण्यात आला होता. तथापि, काटेकोर नियोजन व संबंधित कर्मचारी वर्गाने घेतलेल्या विशेष परिश्रमामुळे हे काम अवघ्या ३५ मिनिटांत पूर्ण करण्यात आले व परिणामी महामार्गावरील वाहतूक तत्काळ सुरळीत करण्यात आली.

या प्रसंगी उपकार्यकारी अभियंता एम.बी. राख, सहाय्यक अभियंता विनय महाडिक व रहमान अत्तार तसेच पनवेल शाखेचे सर्व कर्मचारी प्रत्यक्ष स्थळी उपस्थित होते. मुख्य अभियंता भांडुप परिमंडल, संजय पाटील, अधीक्षक अभियंता पेण मंडळ धनराज बिक्कड, व कार्यकारी अभियंता शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी वाहतूक पोलिस शाखेचे सहकार्य मिळाले.

# ज्ञानदीप शाळेत शिक्षक दिन उत्साहात साजरा

## भेटवस्तू देऊन गौरव

**नवी मुंबई : बातमीदार**

करावे गावातील ज्ञानदीप सेवा मंडळ संस्थेच्या ज्ञानदीप प्राथमिक, माध्यमिक आणि कनिष्ठ विद्यालयात मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या विभागाचा संस्थेत शिक्षक दिन साजरा झाला. सध्या संस्थेत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी कार्यरत संख्या ७० आहे.

संस्थेकडून सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा भेटवस्तू देऊन गौरव केला.

संस्थेचे अध्यक्ष रवींद्र नाईक यांनी शिक्षकांचे कौतुक केले. शिक्षकांमुळे शाळेचे नाव सर्वत्र गाजत आहे. महानगर पालिकेच्या अनेक उपक्रमासाठी शाळेची निवड केली जाते.

शिक्षक दिनाच्या कार्यक्रमास संस्थेचे सचिव अरविंद नाईक, हरिश्चंद्र तांडेल, पंडित तांडेल आणि सुरेखा तांडेल उपस्थित होत्या.

तसेच निवृत्त माजी मुख्याध्यापक वाणी, निवृत्त शिक्षक शिंदे, मुख्याध्यापक पाटीलदेखील उपस्थित होते. शिक्षक दिनाच्या कार्यक्रमाचे नियोजन इंग्रजी विभागाचे मुख्याध्यापक रत्नाकर तांडेल यांनी केले, अशी माहिती प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक बंकट तांडेल यांनी दिली.




# योगासन स्पर्धेत बिर्ला कॉलेज प्रथम

**नवी मुंबई : बातमीदार**

मुंबई विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन योगासन स्पर्धा झोन ३ (पुरुष आणि महिला) २०२५-२६ स्टर्लिंग कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय नेरुळ (पूर्व) नवी मुंबई द्वारे १७ सप्टेंबर २०२५ रोजी आयोजित केली आहे.




या स्पर्धेत एकूण ८५पेक्षा जास्त खेळाडूंनी सहभाग घेतला होता. मुलांच्या सांघिक स्पर्धेत बी.के. बिर्ला नाईट कॉलेज कल्याणने प्रथम, तर बी.के.बिर्ला ऑटोनॉमस कॉलेजने द्वितीय आणि एसएसटी कॉलेज उल्हासनगरने तृतीय क्रमांक पटकावला. तसेच मुलींच्या सांघिक स्पर्धेत पुन्हा बी.के.बिर्ला ऑटोनॉमस कॉलेजला प्रथम पारितोषिक मिळाले, एसआयए महाविद्यालयास द्वितीय तर पेंढारकर महाविद्यालयास तृतीय पारितोषिक मिळाले.

मुलांच्या वैयक्तिक स्पर्धेत बिर्ला महाविद्यालयाच्या उत्कर्ष पितांबरे याला प्रथम व एसएसटी महाविद्यालयाच्या आशिष यादव याला द्वितीय, एसआयए महाविद्यालयाच्या वरुण माळी याला तृतीय पारितोषिक मिळाले. मुलींच्या वैयक्तिक स्पर्धेत एसआयए महाविद्यालयाच्या सानिका गायकर हिने प्रथम, बिर्ला महाविद्यालयाच्या निकुंज सोनी हिने द्वितीय तर बिर्ला महाविद्यालयाच्या ऋषिका कदम हिने तृतीय क्रमांक पटकावला.

कार्यक्रमास मान्यवर पाहुणे उपस्थित होते. एनसीआरडीज स्टर्लिंग कॉलेजचे सीएओ अमरजीत खराडे, प्राचार्य डॉ के. रविवर्मा, जयश्री पोळ (फिजिकल डायरेक्टर). राहुल अकुल (ठाणे झोन ३ चे सचिव), ठाणे झोन स्पोर्ट्स योगासना निवड समिती. तसेच हेमंत पाटील, गणेश सूर्यवंशी, रेश्मा इतामे आणि इंद्रकुश मन्ने हजर होते. अश्या प्रकारे कार्यक्रम यशस्वी रित्या पार पडला.

# मुंबईत ३० सप्टेंबर रोजी डाक अदालत

**नवी मुंबई : बातमीदार**

पोस्टल सेवेला अधिक सक्षम व जनसामान्यांच्या दैनंदिन आयुष्यातील तक्रारींना न्याय मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र सर्कलतर्फे १३२ वी डाक अदालत आयोजित करण्यात आली आहे. ही अदालत ३० सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ४.०० वाजता मुख्य पोस्टमास्तर, जनरल, दूसरा मजला मुंबई येथील कार्यालयात भरविण्यात येणार असल्याची माहिती वरिष्ठ पोस्ट ऑफीस अधीक्षक, नवी मुंबई विभाग, वाशी यांनी दिली आहे.

महाराष्ट्र आणि गोवा राज्याशी सबंधित पोस्टाच्या सेवे विषयी किंवा कामकाजाबद्दल ज्या तक्रारींचे निवारण सहा आठवड्यांच्या आत झालेले नसेल व समाधानकारक उत्तर मिळाले नसेल अशा तक्रारींची या डाक अदालतीमध्ये दखल घेतली जाईल. विशेषतः टपाल वस्तु, मनी ऑर्डर, बचत बँक खते, प्रमाणपत्र इत्यादी बाबतच्या तक्रारी विचारात घेतल्या जातील तक्रारीचा उल्लेख सर्व तपशीलासह केलेला असावा उदा. तारीख व ज्या अधिकाऱ्यास मूळ तक्रार पाठवीली असेल त्याचे नाव व हुद्दा इत्यादी.

# पुस्तक प्रकाशन आणि आदर्श विद्यारत्न पुरस्कार सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पार्टी पदवीधर प्रकोष्ठ व शिक्षक आघाडी, महाराष्ट्र राज्य तसेच आदर्श शैक्षणिक समूह, नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने त्रिशताब्दीतून झळकलेली अहिल्यागाथा या पुस्तकाचे प्रकाशन, राज्यस्तरीय निबंध स्पर्धा पारितोषिक वितरण व आदर्श विद्यारत्न पुरस्कार सोहळा हा प्रेरणादायी व ऐतिहासिक सोहळा रविवार दि.२१ रोजी आदर्श समुहाच्या देवद-विचुंबे येथील संकुलात पार पडणार आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटक व प्रमुख अतिथी म्हणून अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभणार असून त्यामध्ये - ना. प्रा. रामजी शिंदे (सभापती, विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य) आ. प्रशांत ठाकूर आ. निरंजन डावखरे तथा सिनेट सदस्य, मुंबई विद्यापीठआ. ज्ञानेश्वर म्हात्रे आ. विक्रांत पाटील (महामंत्री, भाजप महाराष्ट्र) रवी अनासपुरे (संघटन मंत्री) माधवी नाईक (महामंत्री, भाजप महाराष्ट्र) विजय चौधरी (महामंत्री, भाजप महाराष्ट्र) अविनाश कोळी (जिल्हाध्यक्ष, रायगड) यांच्या उपस्थितीत हा सोहळा साजरा होणार आहे.

अहिल्याबाई होळकर त्रिशताब्दी विशेष हे त्यांच्या कार्यातील समाजसेवा, न्यायप्रियता, स्त्रीशक्तीचा गौरव व धार्मिक-सामाजिक उपक्रम यांचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने हा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत राज्यभरातून तब्बल ११,१३९ निबंध प्राप्त झाले. विद्यार्थ्यांपासून शिक्षकांपर्यंत सर्वांनी अहिल्याबाईंच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला. त्यातील १११ निवडक निबंधांचे संकलन करून त्रिशताब्दीतून झळकलेली अहिल्यागाथा हे पुस्तक तयार करण्यात आले आहे. हे पुस्तक डिजिटल स्वरूपात प्रकाशित होणार असून कोणालाही वाचता येणार आहे.या निबंध स्पर्धेतील विजेत्यांना यावेळी पारितोषिक वितरण केले जाणार आहे.

शैक्षणिक क्षेत्रासह सांस्कृतिक, क्रीडा, सामाजिक व विविध उपक्रमांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या शिक्षकांचा या मंचावर आदर्श विद्यारत्न पुरस्कार २०२५ देउन गौरव करण्यात येणार आहे. हा सोहळा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रात ऐतिहासिक ठरणार आहे.

# माणगाव येथे सेवा पंधरवड्याचा शुभारंभ



**माणगाव : रामप्रहर वृत्त**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत राष्ट्रनेता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती या कालावधीत रायगड जिल्ह्यामध्ये सेवा पंधरवड्याची सुरुवात झाली आहे. जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते माणगाव प्रशासकीय भवन येथे याचा शुभारंभ करण्यात आला तसेच लाभार्थ्यांना विविध लाभ देण्यात आले.

या कार्यक्रमास मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, माणगाव प्रांताधिकारी संदीपान सानप, रोहा प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवड, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख सुनील इंदलकर, सहाय्यक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी तेजस्विनी गलांडे, तहसिलदार दशरथ काळे, गटविकास अधिकारी शुभदा पाटील, नायब तहसीलदार विपुल ढुमे आदी प्रशासकीय अधिकारी व नागरिक उपस्थित होते.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी आपल्या मनोगतात म्हटले की, जिल्ह्यात सेवा पंधरवडा उपक्रमांतर्गत पाणंद रस्ते, रेती, घरकुल, सनद वाटप, सेतू सुविधा केंद्र तसेच आपले सरकार सेवा केंद्र यासारखे लोकाभिमुख उपक्रम राबवून विविध सेवा नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी सेवा पंधरवडा अभियान यशस्वीपणे राबविण्यात येणार आहे.

ते पुढे म्हणाले की, हे अभियान तीन टप्प्यांमध्ये राबविण्यात येणार असून पहिला टप्पा १७ ते २२ सप्टेंबर, दुसरा टप्पा २३ ते २७ सप्टेंबर, तिसरा टप्पा २८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर आहे.

## कलोते-विणेगाव, तासगाव वाडीत आदी कर्मयोगी अभियानाचा प्रारंभ

**रायगड : रामप्रहर वृत्त**

आदिवासींचे जीवनमान उंचावून त्यांना स्वावलंबी आणि आत्मनिर्भर बनवण्यासाठी केंद्र सरकारने धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानांतर्गत आदी कर्मयोगी उत्तरदायी शासन हा राष्ट्रीय पातळीवरील कार्यक्रम सुरू केला आहे. रायगड जिल्ह्यातील १४ तालुक्यांतील ११३ गावांमध्ये हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम राबविला जाणार आहे. या अभियानाचा शुभारंभ खालापूर तालुक्यातील कलोते-विणेगाव कातळाचीवाडी तसेच माणगाव तालुक्यातील तासगाव आदिवासीवाडी येथे जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याहस्ते झाला.

या कार्यक्रमाला मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, प्रकल्प अधिकारी आत्माराम धाबे, माणगाव उपविभागीय अधिकारी संदीपान सानप, सानप, तहसीलदार श्री.काळे, गटविकास अधिकारी शुभदा पाटील, खालापूरचे तहसीलदार अभय चव्हाण, निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी तसेच ब्लॉक मास्टर ट्रेनर आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक धाबे यांनी केले, तर सहायक प्रकल्प अधिकारी तेजस्विनी गलांडे यांनी गाव विकास आराखडा तयार करण्याबाबत मार्गदर्शन केले.

# शासनाच्या योजना ७५ हजार नागरिकांपर्यंत पोहचविणार

## युवा नेते विकास गोगावले यांची ग्वाही

**माणगाव : प्रतिनिधी**



मंत्री भरतशेठ हे कधीही स्वतःसाठी फायदा घेत नाहीत, तर ते गोरगरिबांसाठी अहोरात्र झटत आहेत. शासनाच्या विविध योजना तळागाळातील गोरगरीब जनतेपर्यंत पोचविण्यासाठी ते सतत प्रयत्न करतात. येत्या पाच वर्षात ७५ हजार गोरगरीब नागरिकापर्यंत शासनाच्या विविध योजना आम्ही पोचविणार आहोत, अशी ग्वाही युवासेना राज्य कार्यकारिणी सदस्य व कोकण विभाग सचिव विकास गोगावले यांनी दिली. ते माणगाव येथील शिवसेना आपल्या दारी उपक्रमांतर्गत पात्र नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ वितरण कार्यक्रमात बोलत होते.

कुणबी भवन येथे झालेल्या या कार्यक्रमास व्यासपीठावर दक्षिभ रायगड युवासेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे, संपर्कप्रमुख अरुण चाळके, जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, उपजिल्हाप्रमुख रमेश मोरे, महिला जिल्हा संघटक नीलिमा घोसाळकर, युवासेना उपजिल्हा प्रमुख अविनाश नलावडे, तालुकाप्रमुख महेंद्र मानकर, संतोष पोळेकर, प्रसाद धारिया, सौरभ खैरे, महेंद्र तेटगुरे, सुधीर पवार, अनिकेत घोसाळकर, वैभव मोरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते तसेच या कार्यक्रमासाठी सर्व तालुका, विभाग प्रमुख, उपविभाग प्रमुख, शाखा प्रमुख तसेच तालुक्यातून आलेली शिवसैनिक, नागरिक लाभार्थांची सभागृह तुडुंब भरले होते.

या वेळी विकास गोगावले म्हणाले की, ना. भरतशेठ यांच्या मंत्रिपदाच्या माध्यमातून आम्ही थेट घराघरात जनतेपर्यंत शासनाच्या विविध योजना जास्तीत जास्त पोहचवून नागरिकांना लाभ देणार आहोत. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त मंत्रीमहोदयांच्या वतीने जवळपास ७५ गावांना ५०-५० कोटींचा निधी केंद्र सरकारच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्या वतीने आणि ना. भरतशेठ गोगावले यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रात मिळणार आहे.

आठवडयातून एक दिवस तालुक्यासाठी सर्व अधिकाऱ्यांसह बसून केलेल्या विकासकामांचा आढावा घेणार आहोत. शासनाच्या विविध कल्याणकारी योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोचतात की नाही? कोणता अधिकारी कर्मचारी काम करतो की नाही? हे पाहिले जाईल. द. रायगड युवासेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे हे कुटुंबातील असून ते आणि त्याचे सहकारी कार्यकर्ते रात्रंदिवस या योजना ग्रामीण भागातील तळागाळात जनतेपर्यंत पोहचवण्यासाठी भेटीगाठी घेऊन झटत आहेत. त्यांचे खास कौतुक गोगावलेंनी केले.

प्रस्ताविकात युवासेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे यांनी सांगितले की, राज्याचे मंत्री ना. भरतशेठ गोगावले व आमचे नेते विकासशेठ यांच्या माध्यमातून व मार्गदर्शनाखाली राज्यातला पहिला उपक्रम शिवसेना आपल्या दारी राबवून नागरिकांपर्यंत थेट पोहचवत आहोत. शासनाच्या विविध योजना आहेत. त्या नागरिकांपर्यंत पोहचवणे हे गरजेचे आहे. तरच ग्रामीण भागातील नागरिकांचा विकास होईल असे सांगत या योजना टप्प्याटप्प्याने आपण पोहचवणार असून एकही नागरिक व्यक्ती योजनेपासून वंचित राहणार नाही यासाठी शिवसेना अधिक प्रयत्न करत आहे.

या वेळी प्रमुख अतिथी विकास गोगावले यांच्या हस्ते पात्र लाभार्थ्यांना विविध वस्तू साहित्याचे वाटप करण्यात आले. शासनाच्या या योजनांचा लाभ मिळाल्याने शेतकरी, मजूर, महिला, ज्येष्ठ नागरिक, युवक-युवती यांच्यात समाधानाचे वातावरण पसरले.

# रातवड विद्यामंदिरच्या विद्यार्थ्यांनी परसबागेतून घेतला खरेदी विक्रीचा अनुभव

**माणगाव : प्रतिनिधी**

छत्रपती शिक्षण मंडळ संचालित माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयातील विध्यार्थ्यांनी शाळा उपक्रमांतर्गत भाजीपाला लागवड केली. या विद्यार्थ्यांनी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या मदतीने शालेय परीसरात भाजीपाला, औषधी वनस्पती लागवड करून पीक घेतले आहे.

विविध सामाजिक, सांस्कृतिक व ज्ञानरचनावादी शैक्षणिक उपक्रम राबविणाऱ्या रातवड विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शालेय परिसरात भाजीपाला लागवड केली असून या अंतर्गत यापूर्वी कांदा, वांगी, शिराळी, कोथिंबीर, तोंडली, वांगी, मिरची इत्यादी पीक घेतले आहे. विद्यालयातील विद्यार्थ्यांना पोषण आहारात हा भाजीपाला दिला जात असे.

गेल्या वर्षी शालेय परिसरात गवती चहा पातीची लागवड करण्यात आली होती. गवती चहाची रोपे जोमदार वाढली असून मोठ्या प्रमाणात गवती चहाच्या पाती तयार झाल्या आहेत. हा गवती चहा आरोग्यदायी व औषधी गुणधर्म असल्याने बाजारात चांगली मागणीसुद्धा आहे. त्यामुळे या गवती पातीच्या लहान लहान जुड्या करून विद्यार्थ्यांनी त्याची विक्री केली व त्यातून आर्थिक लाभ मिळविला आहे. विद्यार्थ्यांनी गवत पातीच्या जुड्या तयार केल्या, भाजीपाला विकला तसेच ग्राहकांना त्याचे महत्त्व पटवून दिले. नंतर त्यांचा हिशोब लिहिला व मिळालेले पैसे पुढील लागवडीसाठी कार्यालयात जमा केले.

**शाळेत लागवड केलेल्या भाजीची विक्री झाल्याने विद्यार्थी आनंदित झाले असून त्यांचा उत्साह द्विगुणित झाला आहे. भाजीपाला विक्रीतून विद्यार्थ्यांना शेती व खरेदी विक्रीचा अनुभव मिळावा हा हेतू आहे. विद्यार्थ्यांना यातून आर्थिक साक्षरतेचे व व्यवसायाचे धडेही मिळाले.**

**-संतोष कदम, मुख्याध्यापक**

**शाळा उपक्रमांतर्गत आम्ही भाजीपाला विक्री केला आहे. यातून आम्हाला आनंद मिळाला आहे.**

**-ओंकार हिलम, विद्यार्थी, इयत्ता पाचवी**



# भाजप महिला मोर्चा खालापूर तालुका कार्यकारिणी जाहीर

## श्वेता मनवे यांची अध्यक्षपदी नियुक्ती



**खालापूर : रामप्रहर वृत्त**

खालापूर तालुका भाजप महिला मोर्चा कार्यकारिणी आमदार प्रशांत ठाकूर आणि जिल्ह्याचे अध्यक्ष अविनाश कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली महिला मोर्चा जिल्हा अध्यक्ष प्रिया मुकादम यांनी जाहीर केली. या कार्यकारिणीत अध्यक्षपदी श्वेता मनवे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

याशिवाय सरचिटणीस यशोदा मोरे, उपाध्यक्ष सुप्रिया तटकरे, रोहिणी पाटील, चिटणीस पुनम भऊड, अर्पिता पाटील, खजिनदार करुणा कदम यांचा समावेश अहो.

याबद्दल कामगार आघाडी रायगड जिल्हा संयोजक विठ्ठल मोरे, खालापूर मंडळ अध्यक्ष सनी यादव, माजी जि.प. सभापती नरेश पाटील, महिला मोर्चा माजी अध्यक्ष सुजाता दळवी, खालापूर तालुका उपाध्यक्ष निकिता हेलांडे आदींनी नवनियुक्त कार्यकारिणीतील महिला पदाधिकाऱ्यांना अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

महिला मोर्चाच्या माध्यमातून विविध योजनांची माहिती व लाभ ग्रामीण भागातील जनसामान्य यांच्यापर्यंत पोहचविण्यासाठी तसेच आगामी काळात जिल्हा परिषद व पंचायत समिती संघटनात्मक निवडणुकांसाठी तयारी सुरू आहे.

# साने गुरुजी स्मारकात निसर्गानुभव कार्यशाळा

**माणगाव** : जैवविविधता संवर्धन संशोधन केंद्रातर्फे २७ व २८ सप्टेंबर रोजी निसर्गानुभव कार्यशाळा माणगाव तालुक्यातील वडघर येथील साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकात आयोजित करण्यात आली आहे. प्रसिध्द जैवविविधता तज्ज्ञ पार्थ बापट हे या कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक आहेत.

या कार्यशाळेचा उद्देश निसर्ग सहवासातून आनंद मिळविणे, कोकणच्या निसर्गाकडे शास्त्रीय दृष्टिकोनातून पहायला शिकणे, जैवविविधता या संकल्पनेची ओळख करुन घेणे, पर्यावरण जतन व संवर्धन याबद्दल विचार करणे हा आहे. निसर्गानुभव कार्यशाळेचा कालावधी २७ सप्टेंबर संध्याकाळी ६ वाजल्यापासून २८ सप्टेंबर दुपारी २ वाजेपर्यंत असणार आहे. १२ ते ५५ वयोगटासाठी खुल्या असलेल्या या कार्यशाळेचे प्रवेश नाममात्र शुल्क व जागा मर्यादित आहेत. कार्यशाळेच्या नोंदणीसाठी स्मारक कार्यालय (७७७६९३७८४४), चिंतामणी (९६५७६५१०३५), राहुल (९८६०६१९०३१) यांच्या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जैवविविधता संवर्धन व संशोधन केंद्रातर्फे करण्यात आले आहे.

# चिंचवलीवाडी नवरात्र उत्सव मंडळाची नवीन कार्यकारिणी जाहीर; अध्यक्षपदी गोविंद जांभळे



**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यातील महिला विकास महिला मंडळ चिंचवलीवाडी आयोजित जय हनुमान नवरात्र उत्सव मंडळ चिंचवलीवाडी हे रायगड जिल्ह्यातील एक नामवंत आणि शिस्तप्रिय मंडळ म्हणून ओळखले जाते. या मंडळाचा यावर्षी २६वा वर्धापन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा होत असून शासनाच्या सर्व नियमांचे पालन करत अनेक सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात हे मंडळ अग्रेसर राहिले आहे.

हनुमान मंदिराच्या सभागृहात नुकत्याच झालेल्या ग्रामसभेत नवीन कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली. या सभेला ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व रायगड भूषण अण्णासाहेब उचाटे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच माजी सरपंच कृष्णा तटकरे, विद्यमान सरपंच नंदू पारावे, ग्रामस्थ मंडळ अध्यक्ष चंद्रकांत भोसले यांच्यासह अनेक मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभेत गोविंद जांभळे यांची मंडळाच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली. त्यांच्या उमेदवारीला ग्रामस्थांनी एकमुखी अनुमोदन दिले. याशिवाय सागर कालेकर उपाध्यक्षपदी, सचिन मोरे खजिनदार, संजय पारावे सहखजिनदार, मंगेश कालेकर सचिव, आदित्य माने यांची सहसचिव म्हणून निवड करण्यात आली, तर सदस्य म्हणून सचिन भोनकर, संकेत उचाटे, संदेश सुतार, सुशील दर्गे, सिद्धेश कालेकर, सुमित दर्गे, राजेश तांबडे, महेश तटकरे, सुरेश कालेकर, अक्षय कांबळे, अनिकेत तटकरे, निलेश पांचाळ आदींना संधी देण्यात आली.

या वेळी मंडळाच्या महिला समितीचीही निवड झाली. यात तनुजा शेलार, मृणाल कालेकर, राधिका तटकरे, श्रुती कालेकर, गार्गी जांभळे, नंदा पवार, उर्मिला कालेकर, नेहा पारावे, लावण्या पारावे, सानवी तटकरे, प्रियंका कांबळे, मनीषा होळकर यांचा समावेश झाला. मंडळाचे सल्लागार म्हणून अण्णा उचाटे, कृष्णा शं. तटकरे, नंदू पारावे, चंद्रकांत भोसले, विष्णू तटकरे, अशोक दायते, पांडुरंग भोजने, काशिनाथ बोर्ले, सीताराम मोरे, तुकाराम मंचेकर, अनंत कालेकर, सुरेश तांबडे, बबन तावडे, अंकुश मोरे, राकेश शेलार, चंद्रकांत होळकर, अनंत तावडे यांची नियुक्ती करण्यात आली.

सर्व मान्यवरांनी नवीन कार्यकारिणीचे अभिनंदन केले व आगामी नवरात्रोत्सवासाठी शुभेच्छा दिल्या. बहुसंख्य ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त उपस्थितीमुळे संपूर्ण कार्यक्रम अत्यंत उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. या निवडीमुळे चिंचवली वाडी नवरात्र उत्सव मंडळाची परंपरा कायम राखत आगामी वर्षात अधिक व्यापक सामाजिक व सांस्कृतिक कार्य होईल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला.

# सामाजिक हित जपणाऱ्या पतसंस्थांची आज समाजाला गरज -सचिन बच्छाव

## महात्मा फुले पतसंस्थेकडून मुरुड पालिका शाळांना शालोपयोगी वस्तूंचे वाटप

**मुरूड : प्रतिनिधी**

आज समाजाला सामाजिक हित जपणाऱ्या पतसंस्थेची आवश्यकता आहे. ज्या समाजात आपण राहतो त्या समाजाचे आपण काही तरी देणे लागतो ही उदात्त भूमिका घेऊन कार्य करणाऱ्या पतसंस्था आजही कार्यरत आहेत. आर्थिक क्षेत्रात काम करत असतानादेखील महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था ही खऱ्या अर्थाने जनसामान्यांचे हित पाहणारी पतसंस्था असल्याचा सार्थ अभिमान वाटत असल्याचे प्रतिपादन मुरुड नगर परिषदेचे मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांनी केले आहे.

मुरूड येथील महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्थेकडून येथील नगर परिषदेच्या सहा मराठी शाळांतील सुमारे ३०० शालेय विद्यार्थ्यांना ग्रीन बोर्ड, कंपॉक्स बॉक्स व इतर शालेय उपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. त्या आपल्या अध्यक्षीय भाषणात बच्छाव बोलत होते.

कार्यक्रमास महात्मा फुले पतसंस्थेचे चेअरमन अजित गुरव, माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर, संस्थेचे माजी अध्यक्ष प्रमोद भायदे, संजय गुंजाळ, चंद्रकांत अपराध, अशोक आप्पा विरकूड, संस्थापक अध्यक्ष मनोहर शंकर गुरव, प्रशासन अधिकारी दिपाली दिवेकर, संस्थेच्या उपाध्यक्ष अनघा चौलकर, संचालक संदेश दांडेकर, माळी समाज अध्यक्ष मंगेश पाटील, महेंद्र पाटील, आदेश दांडेकर, अमोल रणदिवे, सायली गुंजाळ, व्यवस्थापक राकेश मसाल, विशाल वीरकूड, प्रथमेश भगत आदी उपस्थित होते.

चेअरमन अजित गुरव यांनी सांगितले कड, पतसंस्थेला झालेल्या नफ्यामधून शाळेतील मुलांना ज्या गरजेच्या वस्तू आवश्यक आहेत त्या देण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे. मुरुड नगर परिषदेच्या एकंदर ३०० विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी वस्तू देण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. ज्या समाजात राहतो त्या समाजाचे आपण काही देणे लागतो ही भावना लक्षात घेऊन पतसंस्थेमार्फत सामाजिक कार्याची जाण ठेवत हा उपक्रम राबवल्याचेही ते म्हणाले.

या वेळी मुरुड नागर परिषदेतील सहा शाळांना इयत्ता पहिली ते चौथीमधील विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांना १०० कंपास बॉक्सचे वाटप करण्यात आले. प्राथमिक शिक्षण विभागाच्या पहिली ते सातवीच्या सर्व सहा शाळांना ग्रीन बोर्ड वाटप करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पल्लवी रेवडे यांनी केले, तर मुख्याध्यापक राजेश भोईर यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी नगर परिषदेच्या शिक्षण विभागातील सर्व मुख्याध्यापक, कर्मचारी व शिक्षकांनी सहकार्य केले.



आशिया चषक क्रिकेट स्पर्धा

# आज भारत वि. ओमान लढत

**अबुधाबी : वृत्तसंस्था**

भारतीय संघाने आशिया चषकातील सुरूवातीच्या दोन्ही सामन्यांमध्ये एकतर्फी विजयाची नोंद केली आहे. स्पर्धेतील पहिल्या सामन्यात यूएईवर विजय मिळवला. त्यानंतर दुसऱ्या सामन्यात पाकिस्तानचा धुव्वा उडवला. यासह भारताने सुपर ४मध्ये आपले स्थान निश्चित केले आहे. दरम्यान त्याआधी भारतीय संघाचा सामना शुक्रवारी (दि. १९) ओमानविरुद्ध होणार आहे.

दोन्ही संघ पहिल्यांदाच आमनेसामने येणार आहेत. नवखा ओमानचा संघ भारतीय संघाविरुद्ध कशी कामगिरी करेल याकडे सर्वांचे लक्ष लागून असणार आहे. दरम्यान ओमान संघात एक असा खेळाडू आहे, जो मुंबईतील विक्रोळीचा आहे. या खेळाडूचे नाव आहे, करण कमलाकर सोनावळे. आशिया चषकासाठी त्याला ओमान संघात स्थान दिले गेले आहे. एकेकाळी भारतीय संघाकडून खेळण्याची स्वप्न पाहणारा हा खेळाडू आता भारतीय संघाविरुद्ध खेळताना दिसणार आहे.




ओमान संघाची जबाबदारी जतिंदर सिंगच्या हाती सोपवण्यात आली आहे. याआधी झालेल्या दोन्ही सामन्यांमध्ये ओमानला पराभवाचा सामना करावा लागला आहे. स्पर्धेतील दोन्ही सामने गमावून ओमानचा संघ सध्या गुणतालिकेत सर्वात शेवटी आहे. पहिल्या दोन्ही सामन्यांमध्ये करण सोनावळेला प्लेइंग ११मध्ये खेळण्याची संधी देण्यात आलेली नाही, पण भारतीय संघाविरूद्ध होणाऱ्या सामन्यात त्याला प्लेइंग ११मध्ये संधी दिली जाऊ शकते. जर त्याला भारतीय संघाविरूद्ध खेळण्याची संधी मिळाली, तर तो कशी कामगिरी करणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# क्रिकेट स्पर्धेत बीसीटी लॉ कॉलेजचा संघ उपविजेता

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माटुंगा येथील आर.ए. पोदार कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड इकॉनॉमिक्स तर्फे नुकतीच एनिग्मा क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत खांदा कॉलनीतील भागुबाई चांगू ठाकूर लॉ कॉलेजच्या क्रिकेट संघाने उत्कृष्ट कामगिरी करत द्वितीय क्रमांक मिळवला.

उपविजेत्या संघात वेदांत मोहिते, यज्ञात पर्थे, रिहंत म्हात्रे, मानव काळे, अजय हिरवे, सत्याम महाजन आणि राणी पाटील यांचा समावेश होता. या संघाने दाखवलेले टीमवर्क, चिकाटी यामुळे त्यांनी सर्वांचे मन जिंकले.

या यशामागे कॉलेजच्या प्राचार्य डॉ. सानवी देशमुख यांचे मार्गदर्शन आणि राघव शर्मा (प्रभारी, व्यायामशाळा समिती) यांचे कुशल नेतृत्व महत्त्वाचे ठरले. त्यांच्या प्रेरणेने आणि संघाच्या क्रीडा कौशल्यामुळे विद्यार्थी सर्वोत्तम कामगिरी करू शकले.



स्पर्धेचे समन्वयन आर्यन घाग (विद्यार्थी प्रतिनिधी, व्यायामशाळा समिती) यांनी केले, तर राघव शर्मा यांनी पूर्ण मार्गदर्शन करून संघाची कामगिरी अधिक प्रभावी केली. हे यश बीसीटी लॉ कॉलेजसाठी अभिमानाचा क्षण ठरला असून संपूर्ण महाविद्यालय परिवाराकडून उपविजेत्या संघाचे अभिनंदन करण्यात आले आहे.

# रायगडातील मुलीही होणार क्रिकेट पंच

## उरण येथे आरडीसीएतर्फे प्रशिक्षण शिबिर



**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन (एमसीए)च्या वतीने क्रिकेटचा स्तर प्रत्येक जिल्ह्यात वाढावा या हेतूने पुरुषांबरोबर महिलांनादेखील क्रिकेट खेळाचे पंच होण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. रायगड जिल्ह्यातसुद्धा महिला क्रिकेट पंच तयार व्हावेत यासाठी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए)च्या वतीने उरण येथील डी.के भोईर यांच्या माऊली हॉल येथे करण्यात आले होते.

एमसीएच्या वतीने आयोजित या पंच परीक्षेची पूर्वतयारी करण्यासाठी हे शिबिर घेण्यात आले. शिबिरात मार्गदर्शन करण्यासाठी बीसीसीआयचे पंच तथा माजी रणजीपटू हर्षद रावले, क्रिकेट नियमांचे तज्ज्ञ नयन कट्टा यांच्यासह एमसीए पॅनलचे पंच विघ्नहर्ता मुंढे, रोहन पाटील, प्रशांत माळी, उरण क्रिकेट असोसिएशनचे सदस्य केसरीनाथ म्हात्रे उपस्थित होते.

एमसीएतर्फे २० सप्टेंबर रोजी महिलांच्या पंच परीक्षेचे आयोजन करण्यात आले असून परीक्षा लेखी, तोंडी व प्रात्यक्षिक स्वरूपात घेतली जाणार आहे.

या पार्श्वभूमीवर आयोजित शिबिरात रायगड जिल्ह्यातील महिला क्रिकेटपटू श्रुती अडित, अस्मिता गोवारी, साची बेलोसे,गार्गी साळुंखे यांनी सहभाग घेतला होता. आरडीसीएचे उपाध्यक्ष राजेश पाटील यांनी शिबिरामध्ये उपस्थित राहून प्रशिक्षणार्थींना शुभेच्छा दिल्या व डी.के भोईर यांनी हॉल विनामूल्य शिबिरासाठी दिल्याबद्दल त्यांचे आभार मानले.

आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक यांच्यासह सर्व पदाधिकारी व सदस्यांनी प्रशिक्षणार्थींना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## नीरजचे पदक हुकले

**टोकियो :** जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये भारताचा गोल्डन बॉय नीरज चोप्राच्या पदरी निराशा पडली आहे. अंतिम फेरीत नीरजला पदकाने हुलकावणी दिली, तर भारताचा दुसरा भालाफेकपटू सचिन यादव चौथ्या स्थानी राहिला.

# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये तालुकास्तरीय कॅरम स्पर्धा

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक संचालनालयाच्या वतीने रायगड जिल्हा क्रीडा परिषद आयोजित तालुकास्तरीय कॅरम स्पर्धा गुरुवारी (दि.१८) रयत शिक्षण संस्थेच्या उलवे नोड येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये झाली. या स्पर्धेत तालुक्यातील विविध शाळांमधील सुमारे ९० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

स्पर्धेचे उद्घाटन गव्हाण विद्यालयाच्या मुख्याध्यापिका व रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य जोत्सना ठाकूर यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून स्थानिक क्रिकेटपटू किरण पाटील, प्रवीण तावडे उपस्थित होते. त्याचप्रमाणे स्कूलच्या प्राचार्य मुक्ता खटावकार व पालक हजर होते.



या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी कॅरमच्या माध्यमातून आपले कौशल्य दाखवून दिले. मुले व मुली अशा दोन्ही गटांमध्ये सामने खेळविण्यात आले. या स्पर्धेतून विद्यार्थ्यांच्या खेळाडूवृत्तीचा विकास होऊन त्यांच्यात आत्मविश्वास, चिकाटी आणि सहकार्याची भावना वृद्धिंगत होईल अशा शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या. स्कूलच्या वतीने स्पर्धा यशस्वी करण्यासाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांचे योगदान लाभले.

चीन मास्टर्स खुली बॅडमिंटन स्पर्धा

# सात्त्विक-चिराग उपउपांत्यपूर्व फेरीत

**शेंझेन : वृत्तसंस्था**

चीन मास्टर्स खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी पुरुष दुहेरीच्या उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला, तर लक्ष्य सेनच्या पराभवामुळे पुरुष एकेरीतील भारताचे आव्हान संपुष्टात आले आहे.

गेल्या आठवड्यात हाँगकाँग ओपनमध्ये उपविजेते ठरलेल्या सात्त्विक आणि चिराग जोडीने मलेशियाच्या जुनैदी आरिफ आणि रॉय किंग याप यांचा २४-२२, २१-१३ असा ४२ मिनिटांत पराभव केला. या विजयासह त्यांनी त्यांच्याविरुद्धचा १०० टक्के विजयाचा विक्रम कायम राखला.

गेल्या आठवड्यात उपविजेता ठरलेल्या लक्ष्य सेनला पुरुष एकेरीच्या पहिल्याच फेरीत पराभव पत्करावा लागला. टोमा ज्युनियर पोपोव्हने त्याचा ११-२१, १०-२१ असा ३० मिनिटांत पराभव केला. यामुळे आयुष शेट्टीच्या पराभवानंतर पुरुष एकेरीतील भारताचे आव्हान संपुष्टात आले. मिश्र दुहेरीत ध्रुव कपिला आणि तनिषा क्रास्टो या जोडीलाही दुसऱ्या मानांकित फेंग यान झे आणि हुआंग डोंग पिंग यांच्याकडून १९-२१, १३-२१ असा पराभव पत्करावा लागला.

# पंतप्रधान मोदींच्या वाढदिवसानिमित्त मेस्सीकडून स्वाक्षरी असलेली जर्सी भेट

## भारत दौऱ्याची उत्सुकता पोहचली शिगेला

**ब्युनॉस आयर्स : वृत्तसंस्था**

स्टार फुटबॉलपटू लियोनेल मेस्सीच्या भारत दौऱ्याची उत्सुकता शिगेला पोहोचली असताना त्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त एक खास भेट पाठवली आहे. ही भेट म्हणजे अर्जेंटिनाने २०२२चा फिफा विश्वचषक जिंकलेल्या संघाची स्वाक्षरी केलेली जर्सी आहे.

मेस्सीच्या भारत दौऱ्याचे नियोजन करणारे सत्तारु दत्ता यांनी या वृत्ताला दुजोरा दिला. दत्ता यांनी पीटीआय वृत्तसंस्थेला सांगितले की, मी फेब्रुवारीमध्ये जेव्हा त्याला भारत दौऱ्याबद्दल भेटलो, तेव्हा मी त्याला सांगितले होते की, पंतप्रधानांचा ७५वा वाढदिवस येत आहे. त्यावर त्याने पंतप्रधानांसाठी स्वाक्षरी केलेली जर्सी पाठवण्याचे आश्वासन दिले होते. ही जर्सी पुढील दोन-तीन दिवसांत पंतप्रधानांच्या निवासस्थानी पोहचण्याची शक्यता आहे.

**१४ वर्षांनी येणार!**

मेस्सीचा हा भारत दौरा २०११नंतरचा पहिला दौरा असेल. त्यावेळी त्याने अर्जेंटिना संघाचे नेतृत्व करत कोलकाताच्या सॉल्ट लेक स्टेडियममध्ये व्हेनेझुएला विरुद्ध मैत्रीपूर्ण सामना खेळला होता, ज्यात अर्जेंटिना १-०ने जिंकला होता. फुटबॉलवेड्या कोलकाता शहरात त्या सामन्याची आठवण अजूनही ताजी आहे.



दत्ता यांनी पुढे सांगितले की, या दौऱ्यादरम्यान मेस्सी आणि पंतप्रधान मोदी यांची प्रत्यक्ष भेट घडवून आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. 'गोट टूर ऑफ इंडिया २०२५' असे नाव दिलेल्या या दौऱ्यात मेस्सी १३ ते १५ डिसेंबरदरम्यान कोलकाता, मुंबई आणि नवी दिल्ली येथे भेट देणार आहे. या दौऱ्याची सांगता १५ डिसेंबर रोजी राजधानीत पंतप्रधानांसोबतच्या भेटीने होणार आहे.














पनवेल : भाजप पनवेल दक्षिण मंडळातील पदाधिकाऱ्यांचा नियुक्तीपत्र प्रदान सोहळा कर्नाळाजवळील हद्दीतील विसावा रिसॉर्टमध्ये झाला. आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्यासह उपस्थित अन्य मान्यवरांच्या हस्ते पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान करून शुभेच्छा देण्यात आल्या.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com